रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक १४१
www.ramprahar.com

◆सोमवार, ८ डिसेंबर २०२५ ◆ पाने ८ ◆किंमत ₹२

## अंतरंग

लहान मुलाचा लैंगिक छळ; अल्पवयींनावर गुन्हा दाखल/२

माणगावमध्ये सतत वाहतूक कोंडी; पोलीसही हैराण/५

एमसीए इन्व्हिटेशन ट्रॉफीतील १५ सामने होणार रायगडात/८

## कुख्यात नक्षलवादी कबीरची साथीदारांसह शरणागती



**भोपाळ :** नक्षलवाद्यांविरूद्ध सुरू असलेल्या सुरक्षा दलाच्या मोहिमेत मध्य प्रदेश पोलिसांना मोठे यश मिळाले आहे. सरकारने तब्बल ७७ लाख रुपये बक्षीस जाहीर केलेला कुख्यात कबीर उर्फ सुरेंद्र याने आत्मसमर्पण केले आहे. त्याच्यासह केबी डिव्हिजन, कान्हा भोरमदेव इथल्या १० नक्षलवाद्यांनीही शरणागती पत्करली. सुरक्षा दलांच्या कारवाईतून अनेक वेळा बचावलेला कबीर हा छत्तीसगडमधील सुकमा जिल्ह्यातील रहिवासी आहे. हे सर्व नक्षलवादी मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव यांच्यासमोर आत्मसमर्पण करतील. केंद्र सरकारने नक्षलवाद्यांच्या निर्मूलनासाठी मार्च २०२६ ही तारीख निश्चित केली आहे, मात्र त्या अगोदरच बडे नक्षलवादी नेते आत्मसमर्पण करत आहेत. मध्य प्रदेशातील नक्षलविरोधी मोहिमेतील पोलिसांचे हे सर्वात मोठे यश असल्याचे मानले जात आहे.

## आजपासून राज्य विधीमंडळाचे हिवाळी अधिवेशन

# सर्व विषयांवर चर्चेस तयार : मुख्यमंत्री

**नागपूर : प्रतिनिधी**

राज्य विधीमंडळाच्या सोमवारपासून सुरू होणाऱ्या हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला महायुती सरकारच्या पत्रकार परिषदेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांच्या टीकेला प्रत्युत्तर देत आरोपांची हवाच काढून टाकली. अधिवेशन काळात सर्व विषयांवर चर्चा करण्यास आम्ही तयार आहोत, असे त्यांनी सांगितले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे समवेत होते.



मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, विरोधी पक्षाने परंपरा पाळत चहापानावर बहिष्कार टाकला आहे. त्यामुळे आम्हालाच आमचा-आमचा चहा प्यावा लागला. विरोधी पक्षाची पत्रकार परिषद निराशेने भरलेले आणि केवळ त्रागा करणारी होती.

महाराष्ट्रात दोन्ही सभागृहांना विरोधी पक्षनेता नाही याबाबत विरोधकांनी उपस्थित केलेल्या प्रश्नावर बोलताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, विरोधी पक्षनेत्यांचा निर्णय हा सर्वस्वी अध्यक्ष आणि सभापतींच्या अखत्यारीत आहे. त्यामुळे त्यासंदर्भात जो निर्णय अध्यक्ष आणि सभापती घेतील तो निर्णय आम्हाला मान्य असेल. त्याबाबत आमचा कुठलाही आग्रह आणि दुराग्रह नाही.

विरोधकांनी राज्य दिवाळखोर झाले अशी टीका महाराष्ट्राच्या आर्थिक स्थितीबाबत केली होती. यावर मुख्यमंत्री फडणवीसांनी उत्तर दिले. आता मला माहिती आहे त्यांना राज्य दिवाळखोर दाखवण्याची घाई झाली आहे. मी त्यांना स्पष्टपणे सांगतो की, राज्याची आर्थिक स्थिती जरी ओढताणीची असली तरी राज्य कुठेही दिवाळखोरीकडे चालले नाही. उलट देशाच्या मोठ्या राज्यात आजही सर्वात निकषांमध्ये चालणारी अर्थव्यवस्था ही महाराष्ट्राची अर्थव्यवस्था आहे. याचा अर्थ माझा असा दावा नाही की, आमच्याकडे खूप पैसे आहेत, पण एवढेच सांगू इच्छितो की ज्या योजना हाती घेतल्या आहेत, त्या योजना पूर्ण करण्यासाठी पैसे आमच्याकडे आहेत आणि आम्ही ते देत आहोत, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

### विरोधकांचा कुणावरही विश्वास नाही!

आमच्या विरोधी पक्षाचा कोणावरच विश्वास उरला नाही, सुप्रीम कोर्ट, निवडणूक आयोग, पीठासीन अधिकारी, सभापती अशा सगळ्या संविधानिक जेवढ्या संस्था आहेत त्यांच्यावर आगपाखड करण्याचे काम ते करत आहेत, असे शरसंधान या वेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी साधले. महाविकास आघाडीच्या पत्रकार परिषदेत भास्करराव जाधव यांनी विजय वडेट्टीवार यांच्या माईकचे बॅटरी काढून टाकली, अशा गमतीजमतीही मुख्यमंत्र्यांनी सांगितल्या.

# गोव्यातील नाईट क्लबमध्ये मध्यरात्री अग्नितांडव!

## २५ जणांचा मृत्यू, सहा जखमी

**पणजी : वृत्तसंस्था**



उत्तर गोव्यातील अरपोरा येथील बिर्च बाय रोमिओ लेन या नाईट क्लबमध्ये मध्यरात्री १२च्या सुमारास झालेल्या भीषण अग्नितांडवात किमान २५ जणांचा मृत्यू, तर सहा जण जखमी झाले आहेत. मृतांमध्ये क्लबमधील कर्मचाऱ्यांसह चार पर्यटकांसह पर्यटकांचा समावेश आहे.

या दुर्घटनेबाबत गोव्याचे पोलीस महासंचालक आलोक कुमार यांनी माहिती देताना सांगितले की, प्राथमिक तपासानुसार गॅस सिलिंडर स्फोटामुळे ही आग लागल्याचे दिसून येते. आगीने काही वेळेतच रौद्र रूप धारण केले. पोलीस, अग्निशमन दल यांनी घटनास्थळी दाखल होत आगीवर नियंत्रण मिळविले, पण तोपर्यंत अनेकांना जीव गमवावा लागला.

मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी रात्रीच घटनास्थळी भेट देत माहिती घेतली. गोव्यातील पर्यटन क्षेत्रासाठी ही अत्यंत दुःखद घटना असल्याचे सांगून मॅजिस्ट्रेट चौकशीचे आदेश त्यांनी दिले आहेत. दरम्यान, या दुर्घटनेप्रकरणी संबंधित नाइट क्लबला सील, तर मॅनेजरला पोलिसांनी अटक केली असून अधिक चौकशी सुरू आहे.

### पंतप्रधानांकडून मदत जाहीर

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांच्याशी संपर्क साधून दुर्घटनेची संपूर्ण माहिती घेतली आणि जखमींबाबत विचारपूस केली. प्रधानमंत्री राष्ट्रीय मदत निधीतून प्रत्येक मृतांच्या नातेवाईकांना दोन लाख रुपये, तर जखमींना ५० हजार रुपयांची मदतही त्यांनी जाहीर केली आहे.



**उलवे नोड :** छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगण, शिवाजीनगर गव्हाण येथे रविवारी उच्च न्यायालयातील वकिलांचा सराव सामना उत्साहात रंगला. या सामन्यास माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी उपस्थित राहून खेळाडूंना प्रोत्साहन दिले तसेच सोमवारपासून सुरू होत असलेल्या महाराष्ट्र इन्विटेशन स्पर्धेसाठी सर्वांना शुभेच्छा दिल्या. या वेळी वकिलांचे मार्गदर्शक माधव साळवी यांनी छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगणाची विशेष प्रशंसा केली. असे उत्कृष्ट व सर्व सुविधा असलेले मैदान उपलब्ध झाल्याने या विभागातील क्रिकेटची प्रगती निश्चित होईल, असे मत त्यांनी व्यक्त केले.

# शिक्षणासारखे दुसरे पवित्र कार्य नाही -आमदार प्रशांत ठाकूर

## पाले खुर्द जि.प. शाळेच्या नूतन इमारतीचे भूमिपूजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जेव्हा शिक्षणासाठी एखादी वास्तू उभी राहते, तेव्हा त्यातून केवळ इमारत उभी राहत नाही, तर पिढ्यान् पिढ्या सुशिक्षित होऊन तेथील सर्वांगीण उत्कर्षाची नवी दिशा निश्चित केली जाते. म्हणूनच शिक्षण देण्यासारखे दुसरे पवित्र कार्य नाही, असे उद्गार आमदार प्रशांत ठाकूर यांनी रविवारी (दि. ७) पनवेल तालुक्यातील पाले खुर्द येथे काढले.



दीपक फर्टीलायझर कंपनीच्या ४२ लाख रुपयांच्या सीएसआर फंडातून पाले खुर्द येथील जिल्हा परिषद शाळेची नूतन इमारत उभारण्यात येणार आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली माजी नगरसेविका अरुणा दाभणे आणि सागर भोईर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हे काम मार्गी लागले आहे. या शाळा इमारतीचे भूमिपूजन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते.

या समारंभास भाजपचे ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, भाजप जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, एकनाथ देशेकर, कृष्णा पाटील, माजी जि.प. सदस्य अमित जाधव, पनवेल पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, पनवेल उत्तर मंडळ अध्यक्ष दिनेश खानावकर, माजी नगरसेवक गणेश कडू, रवींद्र भगत तसेच प्रकाश खैरे, सरस्वती काथारा, माजी सरपंच कमला देशेकर, वासुदेव पाटील, राम पाटील, महेश पाटील, अशोक पाटील, नकुल जोशी, विशाल खानावकर, अरविंद गोंधळी, कैलास मढवी, बाळू काटे, नवनाथ पाटील, नितेश पाटील, अंकुश ढोंबरे, दीपक फर्टीलायझर कंपनीचे अधिकारी श्री. काकडे, श्री. शिंदे, युवा मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, तालुका सरचिटणीस विश्वजीत पाटील यांच्यासह इतर पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आपल्या भाषणात आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, आपल्या उत्पन्नातील काही वाटा समाजासाठी खर्च करावा या उदात्त भावनेतून काम करणाऱ्या संस्था आजच्या काळात हाताच्या बोटावर मोजण्याइतक्याच उरल्या आहेत. यामध्ये दीपक फर्टीलायझर कंपनीचे योगदान अत्यंत मोठे आणि कौतुकास्पद आहे. या वेळी त्यांनी या शैक्षणिक कार्याला प्राथमिकता दिल्याबद्दल माजी नगरसेविका अरुणा दाभणे, सागर भोईर आणि दीपक फर्टीलायझर कंपनीचे आभार मानले.

## निवडक

### 'इंडिगो'चे संकट सहाव्या दिवशीही कायम; ६५० उड्डाणे रद्द

**नवी दिल्ली :** इंडिगो एअरलाइनकडून विस्कळीत झालेली हवाई सेवा सामान्य करण्याचे प्रयत्न सुरू असले तरी सलग सहाव्या दिवशी हे संकट कायम होते. यामुळे रविवारी (दि.७) देशातील प्रमुख विमानतळांवर इंडिगोच्या सुमारे ६५० उड्डाणे रद्द करण्यात आली. याचा प्रवाशांना मनस्ताप सहन करावा लागला. दरम्यान, सरकारने इंडिगोविरोधात कठोर कारवाई करण्याची तयारी सुरू केली आहे.

### स्मृती मानधना आणि पलाश मुच्छलचे लग्न अखेर मोडले!

**मुंबई :** भारतीय महिला क्रिकेट संघाची स्टार फलंदाज स्मृती मानधना हिने संगीतकार पलाश मुच्छलसोबतचा विवाह सोहळा रद्द झाल्याचे जाहीर केले आहे. स्मृतीच्या वडिलांना हृदयविकाराचा झटका आल्यामुळे हा विवाह पुढे ढकलण्यात आल्याचे सांगितले जात होते. या चर्चांवर स्मृतीने इन्स्टाग्राम स्टोरीद्वारे स्पष्टीकरण दिले. पलाशनेही याबाबत खुलासा केला आहे.



या बातमीचा व्हिडीओ पाहण्यासाठी हा क्यूआर कोड स्कॅन करा



**उरण, पनवेल :** राष्ट्रवादी काँग्रेसचे खालापूर तालुका उपाध्यक्ष कैलास म्हात्रे आणि चांभार्ली ग्रुप ग्रामपंचायतीच्या माजी सरपंच वृषाली कैलास म्हात्रे यांनी शनिवारी भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. आमदार महेश बालदी यांनी पक्षाची शाल देऊन त्यांचे स्वागत केले. दरम्यान, म्हात्रे दाम्पत्याने आमदार प्रशांत ठाकूर आणि भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांची सदिच्छा भेट घेतली. या वेळी खालापूर मंडळ अध्यक्ष प्रवीण मोरे, वासांबे (मोहोपाडा) ग्रामपंचायतीचे माजी सरपंच कृष्णा पारंगे, खालापूर पंचायत समितीच्या माजी सभापती कांचन पारंगे, चांभार्लीचे सरपंच प्रतिप पाटील, ग्रामपंचायत सदस्य प्रियंका पाटील, वासांबे विभागीय अध्यक्ष सचिन तांडेल, श्याम म्हस्कर, जगदीश जांभळे, सागर सुखधरे उपस्थित होते.

# आजपासून रायगडातील केंद्रांवर प्रत्यक्ष भातखरेदी

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात भात खरेदीसाठी ४६ केंद्र सुरू झाली आहेत. यासाठी चार हजार शेतकऱ्यांनी ऑनलाइन नोंदणी केली असून सोमवार (दि. ८)पासून प्रत्यक्ष खरेदी प्रक्रिया सुरू होणार आहे. भातातील जास्त आर्द्रतेमुळे त्याचा खरेदीवर प्रत्यक्ष परिणाम होण्याची शक्यता आहे.

यंदाच्या हंगामात आधी परतीच्या पावसाने आणि नंतर अवकाळीने भातशेतीचे मोठे नुकसान झाले. त्यामुळे उत्पादन किती मिळेल आणि खरेदी किती होईल याचा निश्चित अंदाज मार्केटिंग फेडरेशनलादेखील येत नाही. पावसामुळे पिकाची कापणी उशिरा झाली. आता थंडी वाढल्याने भात सुकवणे कठीण होत आहे. परिणामी भातातील आर्द्रतेचे प्रमाण १७ टक्क्यांपेक्षा जास्त आहे. हे प्रमाण शासनाने ठरवलेल्या निकषांपेक्षा जास्त असल्याने शेतकऱ्यांना भातविक्री करण्यात अडथळे येत आहेत. आधार कार्ड आणि बँक खात्याशी लिंक करण्याची केवायसी प्रक्रिया अनेकांनी पूर्ण केलेली नसल्याने नोंदणी आणि विक्री दोन्हींमध्ये अडचणी निर्माण झाल्या आहेत. अल्पभूधारक शेतकऱ्यांना ही प्रक्रिया अधिक त्रासदायक ठरत असल्याचे स्थानिकांकडून सांगण्यात येते.

> **धान्याचा दर्जा, खरेदी केंद्र आणि केंद्रास जोडण्यास आलेली गावे दर्शविणारे फलक सर्व कृषी उत्पन्न बाजार समिती, ग्रामपंचायत, तहसील कार्यालय, पंचायत समिती कार्यालय इत्यादी ठिकाणी त्यांच्या नोटीस बोर्डवर दर्शनी भागावर प्रसिद्धी करण्याबाबत सूचना दिल्या आहेत. शेतकऱ्यांकडून उत्पादित झालेला नवीन भात खरेदी करण्यात येईल.**
> **-के.बी. ताटे,** जिल्हा मार्केटिंग अधिकारी

### दोन दिवसांत रक्कम होणार जमा

भातखरेदी करताना सरकारने शेतकरी आणि खरेदीदार संस्था यांना काही अटी घालून दिल्या आहेत. मागील खरीप हंगामात पाच लाख ३० हजार क्विंटल भात खरेदी करण्यात आली. यंदा ही सरासरी खरेदी गाठण्याचा प्रयत्न केला जात आहे. भातखरेदी प्रक्रिया सुरू झाल्यानंतर दोन दिवसांत खरेदीची रक्कम कोणत्याही परिस्थितीत शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाली पाहिजे, असे शासनाने सूचित केलेले आहे.

## सप्तश्रृंगी गडावरून कार दरीत कोसळली

### सहा जणांचा दुर्दैवी मृत्यू

**नाशिक :** सप्तश्रृंगी मातेचे दर्शन घेऊन घराकडे परतणाऱ्या भाविकांची इनोव्हा कार गडावरून खोल दरीत कोसळून रविवारी (दि. ७) दुपारी भीषण अपघात झाला. या अपघातात कारमधील सहा जणांना आपला जीव गमवावा लागल्याची माहिती समोर आली आहे.

गडावरील गणपती पॉइंटजवळ हा भीषण अपघात झाला. चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटून हा अपघात झाला असावा असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिक, पोलीस आणि आपत्ती व्यवस्थापन पथकांनी तातडीने मदतकार्य सुरू केले, मात्र दरीची प्रचंड खोली आणि दुर्गम भाग यामुळे मदतकार्यात अडचणी आल्या. अडथळ्यांवर मात करून मृतदेह दरीतून बाहेर काढण्याचे काम सुरू होते.

# विविध सुविधांच्या माध्यमातून पनवेल अद्ययावत होण्यासाठी प्रयत्न

## माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांचे प्रतिपादन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शासन संवेदनशील असल्याने ते जनतेपर्यंत पोहचून सेवा देते. प्राण्यांच्या बाबतीतही संवेदनशील असलेल्या पनवेल महापालिकेचे झिरो रेबीज निर्मूलन अभियान कौतुकास्पद आहे. अशा विविध सुविधांच्या माध्यमातून पनवेल अद्ययावत नगर होण्यासाठी प्रयत्न करीत असल्याचे प्रतिपादन माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी रविवारी (दि. ७) केले.



पनवेल महापालिका पशुवैद्यकीय विभागामार्फत आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली झिरो रेबीज निर्मूलन कार्यक्रमांतर्गत शहरातील सर्व पाळीव प्राण्यांसाठी मोफत रेबीज प्रतिबंधात्मक लसीकरण व आरोग्य तपासणी शिबिर नवीन पनवेलमधील जागृती सभागृहात मिनिस्ट्री ऑफ पेट्सच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आले होते. त्या वेळी माजी सभागृह नेते परेश ठाकूर बोलत होते. महापालिकेने या माध्यमातून पाळीव प्राण्यांना चांगल्या प्रकारे आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत तसेच पाळीव श्वानांसाठी फिरते रुग्णालयही सुरू केले याबद्दल त्यांनी कौतुक केले.

या शिबिरास माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. भगवान गीते, डॉ. मधुलिका लाड, माजी नगरसेविका राजश्री वावेकर, वृषाली वाघमारे, मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर यांच्यासह महापालिकेचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

देशात दरवर्षी रेबीजमुळे मोठ्या प्रमाणात नागरिकांचे मृत्यू होत असून त्यापैकी बहुसंख्य प्रकरणे संक्रमित प्राण्यांच्या चाव्यामुळे होतात. रेबीज हा प्रतिबंधात्मक आजार आहे. प्राण्यांचे वेळेवर लसीकरण हा यावर सर्वात प्रभावी उपाय आहे. याच उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले. या वेळी सुमारे २२५ पाळीव मांजरी व श्वानांचे रेबीज प्रतिबंधात्मक लसीकरण करण्यात आले.

# लोकअदालतीत ई-चलन तडजोड प्रकरणे स्वीकारली जाणार नाहीत

**मुंबई, : रामप्रहर वृत्त**

येत्या १३ डिसेंबर २०२५ रोजी राज्यभर आयोजित करण्यात येणाऱ्या लोकअदालतीमध्ये ई-चलान प्रकरणांची तडजोड स्वीकारली जाणार नाही, असे स्पष्टिकरण अपर पोलीस महासंचालक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयाकडून जारी करण्यात आले आहे.

सन २०21 पासून प्रलंबित ई-चलान प्रकरणांच्या निपटाऱ्यासाठी वाहतूक विभागाकडून महाराष्ट्र राज्य विधी आणि सेवा प्राधिकरणाच्या मंजुरीने प्रयत्न केले जात आहेत. मात्र आगामी लोकअदालतीत वाहतूक विभागाकडून कोणतीही ई-चलान प्रकरणे तडजोडीसाठी ठेवली जाणार नाहीत, असे

## नागरिकांनी अफवांना बळी पडू नये!



नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, काही यूट्यूब, इंस्टाग्राम तसेच अन्य सामाजिक माध्यमांवर १३ डिसेंबरच्या लोकअदालतीत ई-चलान दंडात सवलत मिळणार असल्याचा खोटा प्रचार केला जात असल्याचेही निदर्शनास आले आहे. अशा अफवांमुळे नागरिकांची आर्थिक फसवणूक होण्याची शक्यता असल्याने पोलीस विभागाने नागरिकांना सतर्कतेचे आवाहन केले आहे.

वाहतूक विभागाचे नागरिकांना आवाहन

ई-चलान तडजोड किंवा दंडात सवलत याबाबत सामाजिक माध्यमांवरील अपप्रचारावर विश्वास ठेऊ नये. कोणत्याही अनधिकृत लिंकद्वारे ई-चलानची रक्कम भरणा करू नये. जर एखाद्या नागरिकाचे प्रकरण स्थानिक जिल्हा विधी व सेवा प्राधिकरणाने तडजोडीसाठी ठेवले असल्यास, संबंधित न्यायालय किंवा स्थानिक वाहतूक पोलीसांशी थेट संपर्क साधावा, असे पोलीस अधीक्षक (मुख्यालय) सुनील भारव्दाज यांनी कळविले आहे.

# लहान मुलाचा लैंगिक छळ; अल्पवयीनावर गुन्हा दाखल

**नवी मुंबई : बातमीदार**

अल्पवयीन मुलाचा अल्पवयीन मुलानेच लैंगिक छळ केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या घटनेनंतर पीडित मुलाने धास्ती घेऊन घराबाहेर पडणे बंद केल्यानंतर चौकशीत त्याने कुटुंबीयांना घडलेल्या प्रकाराची माहिती दिली. याप्रकरणी एनआरआय पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.




१७ वर्षीय मुलाने १५ वर्षीय मुलाचा लैंगिक छळ केल्याचा आरोप आहे. त्यावरून गुरुवारी रात्री अत्याचार करणाऱ्या मुलावर पॉक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल झाला आहे. दोघेही एकाच परिसरात राहणारे आहेत. २६ नोव्हेंबरला १५ वर्षाचा मुलगा खेळत असताना १७वर्षाच्या मुलाने त्याला आडोश्याला नेऊन अश्लील चाळे केले. यानंतर पीडित मुलाने संधी साधून पळ काढला. त्यानंतरही अत्याचार करणाऱ्याने त्याच्या घराबाहेर येऊन त्याला इशारे करण्याचे प्रकार सुरू ठेवले. यामुळे धास्ती घेतलेल्या पीडित मुलाने घराबाहेर पडणेच बंद केले होते.

पालकांनी केलेल्या चौकशीत संपूर्ण प्रकार समोर आला असता त्यांनी एनआरआय पोलिसांकडे धाव घेतली, मात्र वेगवेगळ्या कारणांनी पोलिसांनी गुन्हा दाखल करण्यात चालढकल केल्याचा पालकांचा आरोप आहे. अखेर समाजमाध्यमाचा आधार घेतला असता गुरुवारी गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्हा दाखल झालेला अल्पवयीन मुलगा गुन्हेगारी प्रवृत्तीचा आहे. यामुळे त्याने इतरही मुलांसोबत अशी कृत्ये केली आहेत का? याचीही चौकशी करण्याची मागणी पीडित मुलाच्या पालकांनी केली आहे.

दरम्यान, अशा घटना दिवसेंदिवस वाढत आहेत. यासाठी नागरिकांनी सतर्क राहून आपल्या आजुबाजूला घडणाऱ्या घटनांकडे लक्ष देणे गरजे आहे. यासोबतच आपली लहानमुले सोशल मिडियावर काय पाहतात, याकडे पालकांनी लक्ष देणे गरजेचे आहे.

# आत्मा अंतर्गत तालुकास्तरीय प्रशिक्षणास शेतकऱ्यांचा प्रतिसाद

**मुरुड : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासन कृषी विभाग कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) अंतर्गत कृषी विभाग आणि पाणी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सन-२०२६ च्या महत्वाकांक्षी सत्यमेव जयते फार्मर कप स्पर्धेकरिता दि .६ डिसेंबर रोजी मुरुड पंचायत समिती सभागृहात तालुक्यातील शेतकऱ्यांचे तालुकास्तरीय प्रशिक्षणास उत्तम प्रतिसाद मिळाला.

या प्रशिक्षणास तहसिलदार आदेश डफळ, तालुका कृषि अधिकारी प्रमोद नरळे, पाणी फाऊंडेशन चे अधिकारी भक्ती कुटे , आशिष लाड, सहाय्यक कृषी सेवक व शेतकरी वर्ग उपस्थित होते.


तहसिलदार आदेश डफळ यांनी शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्राचा अवलंब केला पाहिजे असे सांगुन सामुहिक शेती केल्यास कशी फायदेशीर ठरू शकते या कडे लक्ष वेघले तर पाणी फांउडेशनच्या अधिकाऱ्यांनी फार्मर कप स्पर्धे मध्ये शेतकऱ्यांची गट निर्मिती करून त्या गटांतर्गत एकाच पिकांची निवड करून उत्पादन करणे त्याअंतर्गत गटांसाठी एकत्रित निविष्ठा खरेदी करणे, सामूहिक वाहतूक/विक्री करने, एकमेकांना मदत करून मजूरटंचाईवर मात करणे या बाबींची माहिती देत उत्कृष्ट प्रशिक्षण शेतकऱ्यांना दिले.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सहाय्यक कृषि अधिकारी विशाल चौधरी यांनी केले .सदर प्रशिक्षणास तालुक्यातील प्रगतशील महिला शेतकरी, कृषी सखी मोठया संख्येने उपस्थित होते.सदर प्रशिक्षण यशस्वी होण्यासाठी सहाय्यक कृषि अधिकारी अदिराज चौलकर, मनोज कदम, नथुराम रोहेकर, पराग भोजने, शुभम सपकळ, प्रदिप मालचे यांचे सहकार्य लाभले.

# स्वच्छता मॅरेथॉनमध्ये नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदेंसह सात हजारांहून अधिक नागरिक धावले

**नवी मुंबई : बातमीदार**

स्वच्छ आणि सुंदर नवी मुंबईचा जागर करीत ७ हजाराहून अधिक नागरिकांनी उत्साहाने सहभागी होत पामबीच मार्गावर आयोजित 'स्वच्छ नवी मुंबई हाफ मॅरेथॉन २०२५' हा उपक्रम यशस्वी केला. सकाळी ठीक ४.३० वा सुरू झालेल्या हाफ मॅरेथॉनमधील सर्वाधिक ३२ किमी. अंतराच्या मुख्य गटात नवी मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी स्वत: धावपटू म्हणून सहभागी होत नागरिकांसमवेत स्वच्छतेचा संदेश प्रसारित करीत ही हाफ मॅरेथॉन यशस्वीपणे पूर्ण केली.



५, १०, २१ आणि ३२ किमी अंतराच्या वेगवेगळ्या गटांमध्ये लेट्स सेलिब्रेट फिटनेस यांच्या माध्यमातून नवी मुंबई महानगरपालिकेच्या सहयोगाने श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी शताब्दीचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या या स्वच्छ नवी मुंबई हाफ मॅरेथॉनमध्ये विविध वयोगटातील स्त्री-पुरुष उत्साहाने सहभागी झाले होते. यामध्ये युवकांची संख्या लक्षणीय होती.

सकाळी ४.३० वा. या हाफ मॅरेथॉन मधील ३२ किलोमीटर अंतराच्या गटाला सुरूवात होऊनही इतक्या पहाटे मोठ्या संख्येने आणि उत्साहाने धावपटू उपस्थित होते. नागरिकांनी उत्साही व उत्स्फूर्तपणे सहभागी होत स्वच्छ नवी मुंबई हाफ मॅरेथॉन उपक्रम यशस्वी केल्याबद्दल नागरिकांचे आभार व्यक्त करीत महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी दिव्यांगांनीही सहभागी होत प्रेरणादायी उपस्थिती दर्शविली याचा विशेष उल्लेख केला.

स्वच्छ व पर्यावरणशील शहर ही नवी मुंबईची ओळख असून आरोग्यपूर्ण शहराचे ध्येय नजरेसमोर ठेवून आयोजित केलेल्या हाफ मॅरेथॉन उपक्रमात मोठ्या संख्येने सहभागी झाल्याबद्दल नागरिकांचे तसेच हाफ मॅरेथॉन आयोजनात सहयोग देणाऱ्या लेट्स सेलिब्रेट फिटनेस आणि नवी मुंबई गुरुद्वारा सुप्रीम कौन्सिल व गुरुद्वारा दशमेश दरबार आणि इतर सहयोगी संस्थांचे आयुक्तांनी आभार मानले.

# ऐरोलीतील डॉ. आंबेडकर ज्ञानस्मारकाला अनेकांची भेट

**नवी मुंबई : बातमीदार**

ऐरोली येथे नवी मुंबई महानगरपालिकेने उभारलेल्या भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर ज्ञानस्मारकाची प्रशंसा देशापरदेशातील अनेक मान्यवरांनी व नागरिकांनी मुक्तकंठाने केलेली आहे. ५ डिसेंबर २०२१ रोजी महापरिनिर्वाणदिनाच्या पूर्वसंध्येला येथील सुविधांचे लोकार्पण झाल्यापासून ४ वर्षात ४.५ लाखाहून अधिक नागरिकांनी तेथील रजिस्टरमध्ये नोंद करून भेट देत या ज्ञानस्मारकाचे वेगळेपण अधोरेखित केले आहे व ही संख्या सातत्याने वाढत आहे.

आज महापरिनिर्वाण दिनानिमित्त पहाटेपासूनच नागरिकांनी स्मारकाला भेट देण्यास सुरूवात केली असून सायं. ५ वा. पर्यंत ६ हजाराहून अधिक नागरिकांनी येथे भेट देत बाबासाहेबांच्या प्रेरणादायी स्मृतींना विनम्र अभिवादन केले.



महाराष्ट्र राज्याचे वनमंत्री ना.गणेश नाईक यांनी ज्ञानस्मारकाला भेट देऊन विनम्र अभिवादन केले.


नवी मुंबई महानगरपालिकेच्या ऐरोली, नवी मुंबई येथील ज्ञानस्मारक म्हणून नावाजलेल्या जाणाऱ्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाची माहिती मिळावी व चैत्यभूमीवर येणाऱ्या नागरिकांनी ऐरोली येथील ज्ञानस्मारकाला आवर्जून भेट द्यावी याकरिता महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार, उपआयुक्त श्रीम.संघरत्ना खिल्लारे यांच्या नियंत्रणाखाली चैत्यभूमीवर ज्ञानस्मारकाची माहिती प्रसारित करणारा स्टॉल प्रदर्शित करण्यात आला आहे. काल रात्रीपासूनच या स्टॉलला भेट देण्यास नागरिकांनी सुरुवात केली असून २० हजाराहून अधिक नागरिकांनी ज्ञानस्मारकाची माहिती घेतली

# चर्मकार समाजाला सर्वतोपरी सहकार्य करणार - मुख्यमंत्री

**मुंबई :** चर्मकार समाजाचे आराध्य दैवत संत शिरोमणी रोहिदास महाराज यांच्या ६५० व्या जयंती निमित्त चर्मकार समाजाच्या विविध संघटनांच्या प्रतिनिधींच्या शिष्ट मंडळाची महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सोबत मुख्यमंत्री निवासस्थान वर्षा येथे शनिवारी (दि.६) बैठक पार पडली.

या वेळी संत शिरोमणी रोहिदास महाराज ६५० वी जयंती महोत्सव समितीच्या शिष्टमंडळाने राज्य सरकार व केंद्र सरकार यांच्या आखरीत असलेल्या विविध मागण्यांचे निवेदन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिले. त्याचबरोबर जयंती महोत्सवासाठी भरघोस निधी मंजूर करावा अशी मागणी करणारे निवेदनही या शिष्ट मंडळाने दिले.

चर्मकार समाजाच्या शिष्टमंडळाच्या मागण्यांना उत्तर देताना, शासनाकडून जे सहकार्य अपेक्षित आहे ते भरघोस स्वरूपात आणि सर्वतोपरी केले जाईल असे आश्वासन या वेळी दिले. तसेच दादर येथील राजा शिवाजी विद्यालय येथे संपन्न होणाऱ्या १ फेब्रुवारीला ६५० व्या जयंती महोत्सवाच्या, शुभारंभ समारंभात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपस्थित राहणार असल्याचेही त्यांनी यावेळी बोलताना नमुद केले.



**नवी मुंबई : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त नवी मुंबई महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या हस्ते प्रतिमापूजन करून अभिवादन करण्यात आले. या वेळी उपायुक्त किसनराव पलांडे, अतिरिक्त शहर अभियंता अरविंद शिंदे, उपायुक्त डॉ.अजय गडदे, डॉ.अमोल पालवे, कार्यकारी अभियंता राजेश पवार, मुख्य स्वच्छता अधिकारी राजेंद्र इंगळे आदी उपस्थित होते.**

# लोणेरे विभागात राष्ट्रवादी आणि उबाठा गटाला धक्का

## पन्हळघर खुर्द सरपंच-उपसरपंचांचा शिवसेनेत जाहीर प्रवेश



**माणगाव : बातमीदार**

पन्हळघर खुर्द गावाच्या सर्वांगीण विकासाच्या ध्येयाने प्रेरित होत पन्हळघर खुर्द येथील सरपंच हरिदास शेडगे, उपसरपंच रमेश जाधव तसेच ग्रामपंचायत सदस्य अस्मिता करकरे आणि शेकडो ग्रामस्थांनी राष्ट्रवादी पक्ष आणि उबाठा गटत्याग करून शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. शिवसेना नेते तथा मंत्री नामदार भरत शेठ गोगावले यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून गावकऱ्यांनी हा निर्णय घेतल्याचे सांगण्यात आले.

याआधी पन्हळघर खुर्द ग्रामस्थ राष्ट्रवादी आणि उभाठा पक्षात होते, मात्र त्या काळात पक्ष नेतृत्वाकडून मिळालेली आश्वासने केवळ कागदोपत्री राहिली. गावाच्या मूलभूत सुविधांपासून विकासकामांपर्यंत दुर्लक्ष झाल्याची भावना ग्रामस्थांमध्ये होती. गावाचा विकास हा एकमेव उद्देश डोळ्यासमोर ठेवून सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्यांसह मोठ्या संख्येने ग्रामस्थांनी शिवसेना प्रवेश केला.

गावातील रोजगारनिर्मिती, रस्त्यांचे काम, तसेच प्रकल्पग्रस्तांबाबतच्या जमिनीचा मोबदला मिळणे या महत्त्वाच्या मागण्या सरकारसमोर आहेत. या मागण्यांवर सकारात्मक भूमिका घेत काम करणारा पक्ष म्हणजे शिवसेना असल्याचे ग्रामस्थांनी नमूद केले.

या वेळी ना. भरत शेठ गोगावले यांनी सर्वांचे मनःपूर्वक स्वागत केले. आपण विकास बोलण्यातून नाही, तर थेट कृतीतून दाखवतो. हीच शिवसेनेची कार्यपद्धती आहे. गावाच्या प्रत्येक प्रसंगी मी आणि संपूर्ण शिवसेना तुमच्या सोबत खंबीरपणे उभी राहील, असा विश्वास त्यांनी ग्रामस्थांना दिला.

# चिरनेर कातळपाडा हरिनाम सप्ताहानिमित्त दीपोत्सव

**उरण : प्रतिनिधी**

हरिभक्ती हे भगवंतापर्यंत जाण्याचे साधन असून, प्रत्येकाने भगवंताचे नामस्मरण केल्याशिवाय फळप्राप्ती होत नाही. सोन्याला शुद्ध होण्यासाठी आगीतून जावे लागते तसेच भगवंताची भक्ती होत असताना अनेक अडथळे येत असतात, मात्र भगवंताच्या नामस्मरणाने फळप्राप्ती होते, असा उपदेश अनिल महाराज-वशेणी यांनी काल्याच्या कीर्तनातून केला.

चिरनेर कातळपाडा येथे दत्त जयंती उत्सव सोहळा निमित्ताने सद्गुरु माऊली हसुरमबाबा यांच्या कृपाशीर्वादाने आणि संतांच्या चिंतनाने तसेच गुरुकुलच्या सहकार्याने गजानन महाराज, हभप चिदानंद महाराज, मदन महाराज आणि दात्यांच्या सहकार्याने व्यासपीठ चालक गुरुवर्य हभप अनिल महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली गेले सात दिवस अखंड हरिनाम सप्ताहात ग्रंथ दिंडी, गुरुपूजन, विणा पूजन, प्रतिमा पूजन, दीप प्रज्वलन, ग्रंथ पूजन, कलश पूजन, व्यासपीठ पूजन व श्री गुरुचरित्र ग्रंथ पारायण वाचन असे विविध धार्मिक कार्यक्रम पार पाडण्यात आले.

सप्ताहाच्या सातव्या दिवशी दीपोत्सवाच्या माध्यमातून सप्ताहाची सांगता करण्यात आली. सप्ताहास भाविकांचा प्रतिसाद लाभला.



# वाशी तरण तलाव व्यवस्थापन आता खासगी एजन्सी पाहणार

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेने वाशी सेक्टर १२ मधील बस स्थानकातील स्विमिंग पूल खासगीकरणावर चालविण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी स्वारस्य अभिकर्त्याचा शोध सुरू असून निविदा मागविल्या आहेत.

घणसोलीपाठोपाठ वाशीतील हा महापालिकेचा दुसरा स्विमिंग पूल आहे. महापालिकेने परिवहन उपक्रमाच्या मालकीच्या वाशी सेक्टर-९ आणि सेक्टर १२ मधील बस स्थानकांच्या भूखंडावर वाणिज्य संकुले बांधली आहेत. यात दुकाने, कार्यालयांसह हॉलचा समावेश आहे. ही सर्व भाड्याने वा दीर्घ लीजवर देऊन महापालिका निधी उभारणार आहे. यातील वाशी सेक्टर ९ मधील बस स्थानकाचा शुभारंभ मंत्र्यांच्या वेळेअभावी करता आलेला नाही. अशातच वाशी सेक्टर १२ मधील बस स्थानकातील स्विमिंग पूल पालिकेने सुरू केला असला तरी तो चालविण्यासाठी खासगी ठेकेदाराचा शोध सुरू केला आहे. त्यासाठी १८ डिसेंबर २०२५ पर्यंतची मुदत आहे.

घणसोलीतील सेंट्रल पार्कमध्ये महापालिकेचा ऑलिम्पिक दर्जाचा स्विमिंग पूल आहे. त्याला नवी मुंबईकरांनी चांगला प्रतिसाद दिला असून, सकाळ-संध्याकाळ येथे जलतरणपटूंसह सामान्य नागरिक, महिलांची मोठी गर्दी असते.

वाशी सेक्टर १२ मधील स्विमिंग पुलासही प्रतिसाद मिळण्याची प्रशासनास आशा आहे.

# आर्थिक लोकशाही म्हणजे संधीची समानता -डॉ. रानडे

**नवी मुंबई : बातमीदार**

लोकशाही म्हणजे जीवन जगण्याची पध्दत असून, आर्थिक लोकशाही म्हणजे संधींची समानता असल्याचे मत व्यक्त करीत ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ.अजित रानडे यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अपेक्षित असलेल्या शैक्षणिक सुधारणा, जमीन सुधारणा, कामगारांचे हक्क व सामाजिक सुरक्षा या महत्वाच्या पैलूंवर विविध उदाहरणे देत अभ्यासपूर्ण भाष्य केले

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक ऐरोली येथे महापरिनिर्वाणदिनाचे औचित्य साधून पूर्वसंध्येला 'विचारवेध' या व्याख्यानशृंखलेमध्ये 'आर्थिक लोकशाही आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर' या विषयावरील व्याख्यानात अर्थतज्ज्ञ, लेखक डॉ.अजित रानडे यांनी बाबासाहेबांनी 'प्रॉब्लेम ऑफ रूपी' मधून तसेच त्यानंतरही वेळोवेळी मांडलेले अर्थविषयक विचार आजच्या वर्तमानातही सुसंगत असल्याचे सांगत त्यांचे महत्व उलगडवून सांगितले.



# वावंजे येथे रस्ते काँक्रीटीकरणाचे भूमिपूजन

## भाजप नेते अरुणशेठ भगत यांच्या हस्ते कामाचा शुभारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल विधानसभा मतदारसंघातील शहरी आणि ग्रामीण भागाचा समतोल विकास साधताना आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून दळणवळण अधिक सक्षम करण्यावर भर दिला आहे. त्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्न आणि पाठपुराव्यामुळे वावंजे येथील गोड आंबा ते वावंजे पोलीस चौकी या दरम्यानच्या रस्त्याचे काँक्रीटीकरण करण्यासाठी तब्बल तीन कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या हस्ते या कामाचे भूमिपूजन झाले.



आमदार प्रशांत ठाकूर यांच्या सक्षम नेतृत्वाखाली पनवेल मतदारसंघात नागरी सुविधांचा दर्जा सुधारण्यावर विशेष लक्ष दिले जात आहे. त्यानुसार अर्थसंकल्प आणि एमएमआरडीए च्या माध्यमातून गोड आंबा ते वावंजे पोलीस चौकी दरम्यानच्या रस्त्याचे काँक्रीटीकरण करण्यात येणार आहे. तीन कोटींच्या विकास निधीतून हा रस्ता काँक्रीटचा होणार असल्याने हा मार्ग चकाचक होणार असून, प्रवाशांचा वेळ आणि इंधन या दोन्हीची बचत होणार आहे.

या कामाच्या भूमिपूजनावेळी भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्यासह भाजप नेते संजय पाटील, जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, एकनाथ देशेकर, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य अमित जाधव, पनवेल पूर्व मंडळ अध्यक्ष भुपेंद्र पाटील, पनवेल उत्तर मंडळ अध्यक्ष दिनेश खानावकर, प्रकाश खैरे, राम पाटील, महेश पाटील, माजी सरपंच कमला देशेकर, युवा मोर्चाचे जिल्हा अध्यक्ष आनंद ढवळे, तालुका सरचिटणीस विश्वजीत पाटील, पांडुरंग पाटील, दशरथ पाटील, वासुदेव चोर्मेकर, आत्माराम चोर्मेकर, प्रकाश खैरे, उल्हास पाटील, सचिन पाटील, अरुण थळे, हरेश पाटील, विनोद पाटील, सी.बी.पाटील, बाळा दाढवकर, कैलास मढवी, अंकुश पाटील, दीपक उलवेकर, कृष्णाशेठ पाटील, सागर सांगडे, अशोक साळुंखे, रॅम पाटील, महेश पाटील, अरुण चोर्मेकर, जगन धोंगडे, यांच्यासह परिसरातील अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि वावंजे ग्रामस्थ उपस्थित होते.

### वाहतुकीची समस्या सुटणार!

***आमदार प्रशांत ठाकूर यांच्या दूरदृष्टीमुळे पनवेलचा ग्रामीण भाग आता मुख्य प्रवाहात अधिक वेगाने जोडला जात आहे. गोड आंबा ते पोलीस चौकी हा मार्ग पूर्ण झाल्यानंतर परिसरातील वाहतुकीची समस्या सुटणार असून, सुरक्षेच्या दृष्टीनेही हे काँक्रीटीकरण अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे. विकासाचा हा झंझावात असाच सुरू राहील आणि नागरिकांना सर्व सोयीसुविधा वेळेत उपलब्ध करून दिल्या जातील, असा विश्वास या वेळी उपस्थित नेत्यांनी व्यक्त केला.***

# शेडूंग ते बेलवली रस्त्याचेही होणार काँक्रीटीकरण



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल विधानसभा मतदारसंघाचे कार्यक्षम आमदार प्रशांत ठाकूर यांच्या सक्षम नेतृत्वाखाली मतदारसंघात विकासाचा मोठा धडाका सुरू आहे. त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे आणि प्रयत्नांमुळे नागरीकांना उत्तम दर्जाच्या पायाभूत सुविधा उपलब्ध होत असून, याच प्रयत्नांचा एक भाग म्हणून शेडूंग ते बेलवली या रस्त्याचे काँक्रीटीकरण करण्याचे महत्त्वपूर्ण काम मार्गी लागले आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रयत्नांमुळे चार कोटी रुपयांच्या अर्थसंकल्पीय विकास निधीमधून रस्त्याचे काँक्रीटीकरण केले जाणार आहे. या कामाचे भूमिपूजन भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या हस्ते रविवारी मोठ्या उत्साहात झाले.

शेडूंग ते बेलवली दरम्यानच्या रस्त्याच्या काँक्रिटीकरणाचे हे काम पूर्ण झाल्यानंतर यादरम्यानचा प्रवास अत्यंत सुलभ, सुरक्षित आणि वेगवान होईल, ज्यामुळे स्थानिक शेतकरी आणि नोकरदार वर्गाला मोठा दिलासा मिळणार आहे. या कामाच्या भूमिपूजननावेळी भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य राजेंद्र पाटील, सदस्य अमित जाधव, पळस्पे विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे, पनवेल पूर्व मंडळ अध्यक्ष भुपेंद्र पाटील आणि युवामोर्चाचे जिल्हा अध्यक्ष आनंद ढवळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या सोहळ्याला योगेश लहाने, अतुल घरत, सुनील पाटील, सुभाष पाटील, राजेश पाटील, रेवींद्र शिसवे, महेश लहाने, अप्पा भागीत, दिनेश पाटील, मच्छिंद्र पाटील, भालचंद्र पाटील, तुळशीराम पाटील, सतिष पाटील, विकास मोरे, ज्ञानेश्वर बुवा पाटील, अविनाश पाटील, नामदेव पाटील आणि तालुका सरचिटणीस विश्वजीत पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली मतदारसंघाच्या कानाकोपऱ्यात पोहचलेली ही विकासकामे पाहून स्थानिक नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

# लोकनेते रामशेठ ठाकूर विद्यालयाला स्वच्छ व हरित विद्यालयाचे मानांकन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शिक्षण मंत्रालयाद्वारे पनवेल तालुक्यातील शाळांचे नुकतेच परीक्षण करण्यात आले असून यामध्ये कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल आणि ज्युनिअर कॉलेजला अत्यंत मानाचे स्वच्छ एवं हरित विद्यालय हे मानांकन पाच स्टारसह प्राप्त झाले आहे. या यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर आणि विद्यालयाचे चेअरमन आमदार प्रशांत ठाकूर यांनी प्राचार्यांचे व कर्मचाऱ्यांचे विशेष अभिनंदन केले आहे.

शाळेत असणारी पिण्याच्या, तसेच वापराच्या पाण्याची उपलब्धता. त्याची स्वच्छता, आरोग्य रक्षणार्थ घ्यावयाची खबरदारी, पर्यावरण स्थिरता आणि भविष्यातील पर्यावरण तसेच खास करून स्वच्छतागृहांची स्वच्छता व विद्यार्थ्यांची घेतली जाणारी काळजी,अशा सर्वच पातळांवर कसोशीने तपासणी करूनच हे मानांकन दिले जाते. विद्यालयाच्या विद्यार्थ्यांची शिस्त त्यांच्या आरोग्याची घेतली जाणारी काळजी, विद्यार्थ्यांची संख्या व त्याच प्रमाणात उपलब्ध असणाऱ्या स्वच्छतागृहांची संख्या व एकंदरीत स्वच्छ व आरोग्यपूर्ण वातावरण या संदर्भात जवळपास १२८ प्रश्नांचीसूची मूल्यमापनासाठी निकष म्हणून तयार केलेली असते. ज्याची तपासणी प्रत्यक्ष प्राथमिक शिक्षण अधिकारी अलिबाग ललिता दहितूळे व माध्यमिक शिक्षण अधिकारी अलिबाग श्री महारुद्र नाळे या अधिकाऱ्यांनी केली.

### मान्यवरांकडून कौतुक व अभिनंदन






रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर, विद्यालयाचे चेअरमन आमदार प्रशांत ठाकूर तसेच विस्तार अधिकारी निंबाजी गीते, केंद्रप्रमुख रंजना केनी, भालेराव, केंद्रप्रमुख केणी, ब्रिजेश पटेल आदी मान्यवरांच्या उपस्थितीत विद्यालयाच्या प्राचार्या स्वप्नाली म्हात्रे यांनी हे मानांकित प्रशस्तीपत्रक स्वीकारले.

प्रत्यक्ष दर्शनी निकषातून पनवेल तालुक्यातून लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल आणि ज्युनिअर कॉलेज कामोठे या विद्यालयाला सदर मानांकन प्राप्त झालेले आहे. विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासाबरोबरच त्यांच्या आरोग्याच्याही काळजीसाठी सदैव तत्पर असणाऱ्या विद्यालयाच्या प्राचार्या स्वप्नाली म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखालीच विद्यालयाच्या स्वच्छतेची व शिस्तबद्धतेची घडी बसलेली आहे हे पुन्हा एकदा सिद्ध झाले. विद्यालयाच्या विकासाबरोबरच आरोग्यहितासाठी मिळालेले हे मानांकन म्हणजे विद्यालयासाठी अभिनंदनिय बाब आहे तसेच अभिमानास्पद बाबही आहे.

प्राचार्य स्वप्नाली म्हात्रे यांनी पर्यवेक्षिका सारिका लांजुडकर, नेहा खन्ना, मिनल नाईक तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांचेही अभिनंदन केले. अभ्यासाबरोबरच स्वच्छ व पूरक वातावरणात विद्यार्थ्यांच्या प्रगतीला निश्चितच गती देणारा हा पुरस्कार म्हणजे विद्यालयासाठी अभिमानाची गोष्ट आहे.

# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते दिनदर्शिकेचे प्रकाशन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जाणीव एक सामाजिक संस्थेच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेल्या २०२६ सालच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते रविवारी झाले.

या वेळी आमदार ठाकूर यांनी संस्थेच्या वर्षभर चाललेल्या सामाजिक कार्याची प्रशंसा करत येणारे नवीन वर्ष हे सर्वांना आनंदाचे आणि समाधानाचे जाईल अश्या शुभेच्छा दिल्या तसेच जाणीव एक सामाजिक संस्थेच्या माध्यमातून वर्षभर होत असलेले सामाजिक कार्य कौतुकास्पद आहे असे म्हणाले. जाणीव एक सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा भाजपचे जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील यांनी ही दिनदर्शिका प्रकाशित केली आहे.

या प्रकाशन सोहळ्याला भाजपचे जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, माजी नगरसेविका सुरेखा मोहकर, प्रीती जॉर्ज, माजी नगरसेवक अजय बहिरा, डी आर भोईर, प्रदीप सावंत, शहर उपाध्यक्ष केदार भगत, प्रीतम म्हात्रे, उमेश इनामदार, प्रसाद हनुमंते, कल्पना राऊत, लीना पाटील, सपना पाटील, संगीता कांडपिले, विलास मोहकर, जॉनी जॉनी, भूषण पोवळे, सुधीर देसाई, महेश सरदेसाई, संजीवनी खिल्लारे, सविता म्हात्रे, सुवर्ण सहजराव, दिपाली कुरंगले, कविता बीडलांन आदी उपस्थित होते.



## महापरिनिर्वाण दिनानिमित्त उरणमध्ये महामानवाला अभिवादन



**उरण : बातमीदार**

महापरिनिर्वाण दिनानिमित्त उरणमधील डॉ.बाबासाहेब आंबेडकर गार्डन येथे महापरिनिर्वाण दिनानिमित्त विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून पूजन करून अभिवादन करण्यात आले.

या सोहळ्यास प्रकाश कांबळे, हरीश जाधव, विनोद कांबळे, कुणाल जाधव, अखिलेश जाधव, रोशन गाडे, आनंद जाधव, सुरेश गायकवाड, साहिल जोशी, कुणाल गायकवाड आणि विजय गायकवाड या कार्यकर्त्यांनी उत्साहाने उपस्थिती लावली. महिला मंडळ अध्यक्ष सुनिता सपकाळे, करूनच भिंगावडे, कविता जाधव, स्वप्नाली कवडे आणि गीता कांबळे यांनी या कार्यक्रमाला हृदयस्पर्शी बळ दिले.

या नंतर आंबेडकर गार्डनमध्ये प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून रॅली काढण्यात आली. आंबेडकर गार्डन –जरी मरी मंदिर – पालवी हॉस्पिटल– राजपाल नाका – गणपती चौक – नगरपालिका – आपला बाजार – गांधी पुतळा – आणि पुन्हा आंबेडकर गार्डन या मार्गावर रॅली निघाली.

# रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये आंतरशालेय सामान्य ज्ञान स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या उलवे येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये शनिवारी महाराष्ट्र नॉलेज लीग आंतरशालेय सामान्य ज्ञान स्पर्धा एक्सप्लोर द लेगेसी अँड मास्टर द फॅक्ट या भव्य उपक्रमाचे अत्यंत उत्साहात आणि यशस्वीरीत्या आयोजन केले. ही स्पर्धा संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त आणि शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या बहुमोल योगदानाचा गौरव करण्यासाठी आयोजित करण्यात आली होती.



या वेळी संस्थेच्या सदस्या अर्चना ठाकूर यांनी शाळेच्या कौतुकास्पद प्रयत्नांची प्रशंसा केली आणि विद्यार्थ्यांना महाराष्ट्राच्या वैभवशाली परंपरेचा सतत शोध घेत राहण्यासाठी प्रोत्साहित केले. कार्यक्रमाची सुरुवात मुख्याध्यापक किरणकुमार सुथार यांच्या हस्ते झाली. महाराष्ट्राचा समृद्ध इतिहास, भूगोल, संस्कृती, साहित्य, किल्ले आणि महान व्यक्तिमत्त्वांसह चालू घडामोडींचे ज्ञान विद्यार्थ्यांमध्ये वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने आयोजित या स्पर्धेत विविध शाळांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

ही स्पर्धा लेखी चाचणी, फोर्ट्स अँड फ्रंटियर्स, द तलवार चॅलेंज, गेटवे टू जिनियस आणि द छत्रपती चॅलेंज अशा पाच फेऱ्यांमध्ये पार पडली. या सर्व फेऱ्यांमध्ये विद्यार्थ्यांनी आपल्या अफाट ज्ञानाचे, आत्मविश्वासाचे आणि प्रसंगावधानाचे उत्कृष्ट प्रदर्शन केले. पहिली ते दहावी या प्रत्येक गटातील विजेत्या संघांना प्रमुख अतिथी अर्चना ठाकूर यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले, तसेच सर्व सहभागी संघांना प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली.

# महागणपतीच्या दर्शनासाठी गणेशभक्तांच्या गर्दीचा उच्चांक



**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील चिरनेर श्री महागणपती क्षेत्रात, संकष्टी चतुर्थी निमित्ताने काल रविवारी थंडीची तमा न बाळगता अगदी पहाटेपासूनच भाविकांनी प्राचीन जागृत श्री महागणपतीच्या दर्शनाचा लाभ घेतला. पहाटे चार वाजल्यापासून गणेश भक्तांच्या दर्शनासाठी मंदिर खुले करण्यात आले होते.

काही भाविकांनी पायी वारी करीत, गणेश मंदिर गाठून श्रींचे दर्शन घेतले. पेशवेकालीन मंदिरात प्राचीन श्री महागणपतीची मूर्ती विराजमान आहे. दिवसभर श्री महागणपतीच्या मंदिरात भजनांचा सूर ऐकायला मिळाला. रविवारचा सुट्टीचा दिवस असल्यामुळे भाविकांच्या गर्दीचा उच्चांक पाहायला मिळाला.

संकष्टी चतुर्थीच्या निमित्ताने हार, गावठी भाज्या, वाल चवळीच्या शेंगा, रानटी कंदमुळे, स्थानिक कुंभारानी बनविलेली मातीची भांडी तसेच अन्य पदार्थांच्या विक्रीला ग्राहकांनी पसंती दर्शविल्याचे निदर्शनास आले. चिरनेर परिसरातील अनेक रहिवाशांना दर महिन्याच्या संकष्टी चतुर्थी निमित्ताने रोजगार मिळत आहे. नेहमीप्रमाणे उरण, पनवेल, पेण, नवी मुंबई येथील भाविकांनी श्रींच्या दर्शनाचा लाभ घेतला असल्याचे गणपती देवस्थानतर्फे सांगण्यात आले.

# बेलपाडा गावात हरिनाम सप्ताह

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

बेलपाडा येथील तुकाराम घरत यांच्या निवासस्थानी सालाबाद प्रमाणे यंदाही ३६व्या वर्षात बेलपाडा येथील श्रीकृष्ण वारकरी हरिपाठ मंडळाच्या वतीने सालाबादप्रमाणे यंदाही अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून, तुकोबाराय गाथा पारायणाचे वाचन होणार आहे. त्या अनुषंगाने शुक्रवार ५ डिसेंबर रोजी अखंड हरिनाम सप्ताहाला प्रारंभ झाला आहे.. हा अखंड हरिनाम सप्ताह १२ डिसेंबर २०२५पर्यंत चालणार आहे. यंदाचे हे ३६ वे वर्ष हे त्रिपपुर्ती सोहळा म्हणून साजरा करण्यात येत आहे.



अखंड सप्ताहामध्ये काकड आरती, गाथा पारायण, संगीत भजन, हरिपाठ अशा विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, या सप्ताहात खास करून, सुप्रसिद्ध कीर्तनकार हभप संतोष महाराज (सातारा)हभप कृष्णा महाराज (खोपोली) हभप गणेश महाराज (भिवंडी) हभप उल्हास सूर्यवंशी महाराज (आळंदी) हभप चैतन्य महाराज (खंडागळे चौक) आचार्य हभप प्रल्हाद महाराज शास्त्री, हभप मारुती महाराज, हभप विक्रांत महाराज (कल्याण) या महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध नामांकित कीर्तनकारांची किर्तन सेवा आयोजित करण्यात आली आहे.

या सप्ताहाच्या माध्यमातून समाजातील अनिष्ट रुढी, परंपरा समाजात असलेले ताणतणव, साक्षरता, निसर्गप्रेम, समता आणि बंधुत्व, तसेच स्त्रीभ्रूणहत्या अशा महत्त्वाच्या विषयावरती विशेष मार्गदर्शन आणि प्रबोधन होणार असल्याची माहिती हभप गजानन ठाकूर महाराज व भजनी बुवा अशोक म्हात्रे यांनी दिली.

# द्रोणागिरी उरण येथे महापरिनिर्वाण दिन

**उरण : बातमीदार**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक शैक्षणिक सांस्कृतिक संघ द्रोणागिरी तर्फे भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ वा महापरिनिर्वाण दिना निमित्त देवकृपा, द्रोणागिरी उरण येथे अभिवादन करण्यात आले.

या वेळी अध्यक्ष नामदेव कुरणे, उपाध्यक्ष जगन्नाथ मेश्राम, सहसचिव शिवनाथ गायकवाड, सहसचिव सिद्धार्थ घोरपडे, तुषार गायकवाड, डॉ. प्रकाश दाभाडे, सिद्धार्थ जाधव, प्रमोद कांबळे, संगम कांबळे, नवनित कांबळे, कुणाल जाधव, आशिष रामटेके, रजनिश वासनिक, मारुती खुणे, सुनिल गायकवाड, प्रकाश पळसपगार, डॉ. सविता डेरे आदी उपस्थित होते.



## संपादकीय

# आगीच्या वाढत्या घटना

गोव्यातील एका नाईट क्लबमध्ये लागलेल्या भीषण आगीत २५ जणांना आपले प्राण गमवावे लागले. अलीकडच्या काळात शहरांसह अगदी ग्रामीण भागातही आगीच्या घटना वाढताना दिसत आहेत. जागतिक पातळीवरदेखील अशा काही दुर्घटना समोर आल्या, ज्यात अनेकांचा बळी गेला. नियमांचे उल्लंघन, निष्काळजीपणा, संभाव्य धोका दिसत असूनही डोळेझाक यांसारख्या कारणांमुळे अनेकांना त्याची किंमत चुकवावी लागत आहे.

**पर्यटनासाठी प्रसिद्ध असलेल्या गोव्यात देशी-विदेशी पर्यटकांची नेहमी गर्दी असते. आता तर पर्यटन हंगाम जोरदारपणे चालू असून लवकरच ख्रिसमसचा सण सुरू होणार आहे. यासाठी गोव्यात तयारी सुरू असतानाच अरपोरा येथील बिर्च बाय रोमिओ लेन या नाईट क्लबमध्ये मध्यरात्री आग लागली. पणजीपासून सुमारे २५ किमी अंतरावर असलेला हा नाईट क्लब गेल्या वर्षीच सुरू झाल्याचे सांगण्यात येत आहे. या क्लबमध्ये मध्यरात्री १२च्या सुमारास भीषण आग लागली. बघता बघता या आगीने रौद्र रूप धारण केले आणि होत्याचे नव्हते झाले. प्राथमिक तपासात सिलिंडरच्या स्फोटामुळे हे अग्नितांडव झाल्याचे समोर आले आहे, पण याखेरिज धोकादायक स्थान, अरुंद वाट, नियमांचे उल्लंघन अशा गोष्टीदेखील कारणीभूत आहेत, ज्यामुळे २५ जणांचा बळी गेला, तर सहा जण जखमी आहेत. पोलीस आणि अग्निशमन विभागाकडून अधिक तपास सुरू आहे. गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी घटनास्थळी भेट देऊन या क्लबने कोणत्या परवानग्या घेतल्या होत्या? कोणाकडून परवानग्या देण्यात आल्या? याची चौकशी केली जाईल. अग्निसुरक्षा नियम आणि इमारत बांधकाम नियमांचे पालन केले आहे का? ते तपासलं जाईल. क्लब मालकांविरुद्ध अटक वॉरंट जारी करण्यात आले आहे. व्यवस्थापक आणि इतरांना आधीच अटक करण्यात आली आहे. दोषींना तुरुंगात टाकले जाईल, असे स्पष्ट केले, तर भाजप आमदार मायकल लोबो यांनी गोव्यातील इतर सर्व क्लबचे सेफ्टी ऑडिट करणे आवश्यक आहे याकडे लक्ष वेधले. त्याचप्रमाणे भविष्यात अशा घटना घडू नयेत. पर्यटकांसह आस्थापनांमधील कामगारांची सुरक्षा अत्यंत महत्त्वाची आहे हेही अधोरेखित केले. अलीकडच्या काळात सर्वत्रच आगीच्या घटनांनी चिंताजनक प्रमाण गाठले आहे. निवासी इमारती, व्यावसायिक संकुले, कारखाने, गोदामे, रुग्णालये, कापडगाळे तसेच ग्रामीण भागातील शेतीमाल व वस्ती-सर्वच ठिकाणी आग मोठ्या प्रमाणावर जीवित व संपत्तीची हानी करणारी आपत्ती बनली आहे. अनेक घटनांमध्ये अग्निशमन दलाला वेळेत माहिती न मिळणे, नियमांचे पालन न होणे, ओव्हरलोड झालेली विद्युत वायरिंग, असुरक्षित यंत्रे आणि मानवी निष्काळजीपणा हे मोठे कारण म्हणून समोर येत आहे. आग लागण्याची कारणे जितकी गंभीर, तितक्याच गांभीर्याने प्रतिबंधात्मक उपायांची अंमलबजावणी करणे गरजेचे आहे.. जसे की अग्निसुरक्षा उपकरणांचा योग्य वापर, प्रशिक्षण, नियमित तपासणी, आपत्कालीन बाहेर पडण्याचे मार्ग आणि जागरूकता. शासन, स्थानिक यंत्रणा, उद्योग आणि सामान्य नागरिक या सर्वांनी मिळून आग सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य दिले, तर आपण अशा दुर्घटनांची साखळी रोखू शकतो. सजग समाजच सुरक्षित समाज घडवू शकतो. सर्वांनी सुरक्षा आणि जबाबदारी यांना महत्त्व दिले, तर या घटनांवर नियंत्रण ठेवता येईल, कारण आयुष्याचे मूल्य आणि जीवित सुरक्षितता सर्वात महत्त्वाची आहे.**

# ध्वज दिन निधीद्वारे सैनिकांप्रती कृतज्ञता व्यक्त करुया!



मातृभूमीच्या रक्षणासाठी, देशाच्या सार्वभौमत्वासाठी आणि भारतीयांच्या सुरक्षिततेसाठी रात्रंदिवस सीमेवर तैनात असणाऱ्या आपल्या शूर सैनिकांच्या शौर्य, समर्पण आणि देशसेवेला सलाम करण्याचा दिवस म्हणजे सशस्त्र सेना ध्वज दिन.! केंद्र आणि राज्य शासनाच्या वतीने सैनिक आणि त्यांच्या कुटुंबियांसाठी अनेक योजना राबवल्या जातात. परंतु देशवासीयांनाही सैनिकांप्रती कर्तव्य बजावण्याची संधी मिळावी आणि जनसहभागातूनही सैनिक आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या कल्याणासाठी थेट निधी देता यावा, यासाठी ध्वज दिन निधी संकलन करण्यात येतो. दरवर्षीप्रमाणे यावर्षीही ७ डिसेंबर रोजी सशस्त्र सेना ध्वज दिन राष्ट्रभक्तीच्या उत्साहात देशभर साजरा झाला

**ध्वजदिनाची पार्श्वभूमी**

२८ ऑगस्ट १९४९ रोजी देशाच्या तत्कालीन संरक्षण मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत दरवर्षी ७ डिसेंबर रोजी ध्वजदिन साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला. या दिवशी नागरिकांना सशस्त्र सेनेचे प्रतिक असलेले छोटे ध्वज वितरित करुन निधी संकलनाची परंपरा सुरु करण्यात आली. १९९३ मध्ये संरक्षण मंत्रालयाच्या मार्गदर्शनाखाली विविध सैनिक कल्याण निधी एकत्र करुन त्याचे एकत्रित नाव सशस्त्र सेना ध्वज दिन निधी असे ठेवण्यात आले. तसेच हा निधी सैनिक व त्यांच्या कुटुंबीयांच्या कल्याणासाठी वापरण्यात येऊ लागला.

**ध्वज दिनाचा उद्देश**

नागरिकांमध्ये देशभक्तीची भावना जागृत करणे, सैनिकांच्या त्यागाचे आणि योगदानाचे स्मरण करुन देणे, शहीद सैनिकांचे कुटुंब, जखमी जवान, माजी सैनिक यांच्या कल्याणासाठी मदत उपलब्ध करणे, सैनिकांसाठी नागरिकांमध्ये कर्तृत्व, दातृत्व निर्माण करणे तसेच राष्ट्रीय एकात्मता आणि सहकाराची भावना वाढीस लावणे, हे ध्वज दिनाचे उद्देश आहेत. हा निधी लोकसहभागातून संकलित केला जातो आणि तो थेट सैनिक व त्यांच्या कुटुंबांच्या कल्याणासाठी वापरला जातो.

**ध्वज निधी संकलन कशासाठी**

ध्वज दिन निधीमधून सैनिकांच्या कल्याणासाठी अनेक उपक्रम राबविण्यात येतात. जखमी आणि अपंग सैनिकांवर उपचार, त्यांचे पुनर्वसन, निवृत्त सैनिकांना आरोग्य सुविधा, निवृत्ती वेतन, शहीद सैनिकांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत तसेच सैनिकांच्या मुलांच्या शिक्षणासाठी शिष्यवृत्ती असे अनेक उपक्रम सैनिक आणि त्यांच्या कुटुंबीयांचे जीवनमान उंचावण्यासाठी राबवले जातात. घरातला कर्ता पुरुष गेल्यानंतर एखादे कुटुंब उघड्यावर पडू नये, यासाठी शासन आपली जबाबदारी निभवते, परंतु सामाजिक दायित्व म्हणून त्यांच्या पाल्याप्रती सहवेदना व्यक्त व्हावी हा देखील यामागचा उद्देश आहे.

**निधीचा वापर**

राज्यात संकलित झालेल्या सशस्त्र सेना ध्वजदिन निधीमधील ६० टक्के निधी राज्याच्या सैनिक कल्याण विभागाच्या मंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील समितीद्वारे निर्धारित धोरणानुसार सेवारत तथा माजी सैनिक व त्यांच्या कुटुंबियांच्या कल्याणासाठी राबवल्या जाणाऱ्या विविध योजनांवर खर्च केला जातो. उर्वरित ४० टक्के निधी राज्याचे राज्यपाल यांच्या अध्यक्षतेखालील समितीद्वारे निर्धारित धोरणानुसार सैनिक मुला-मुलींची वसतिगृहे व सैनिक विश्रामगृहे निर्माण करण्यासाठी व चालवण्यासाठी वापरला जातो.

**निधी संकलन**

सशस्त्र सेना ध्वज दिन निधी संकलनासाठी सन २०२३ सालासाठी महाराष्ट्र राज्याला ३६ कोटी ६४ लाख रुपये उद्दिष्ट दिले होते, परंतु ४३ कोटी ६८ लाख २ हजार ५४ रुपये म्हणजेच ११९.२१ टक्के निधी संकलित झाला. तर सन २०२४ वर्षासाठी ४० कोटी रुपये उद्दिष्ट देण्यात आले होते, पण नागरिकांच्या उस्फुर्त सहभागामुळे ४८ कोटी ९४ लाख ८१ हजार ३१८ रुपये म्हणजेच १२२.३७ टक्के निधी संकलित झाला आहे. ही आकडेवारी देशवासीयांच्या देशभक्तीची, सैनिकांप्रती असलेल्या आदराची, प्रेमाची, सन्मानाची व अभिमानाची साक्ष असून या निधीच्या माध्यमातून आपणही सैनिक आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी थेट योगदान देऊ शकतो.

**उत्कृष्ट निधी संकलनाबद्दल राज्यपालांच्या हस्ते सन्मान**

सशत्र सेना ध्वजदिन २०२४ निधी संकलनात सर्वात जास्त निधी संकलन केल्याबद्दल छत्रपती संभाजीनगरचे विभागीय आयुक्त तसेच सिंधुदुर्ग, अहिल्यानगर, सोलापूर, बीड, अमरावती, नागपूर या ६ जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी तथा ध्वजदिन निधी कल्याण समितीचे अध्यक्ष व जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांना मुंबई येथील लोकभवन(राजभवन) मध्ये १० डिसेंबर २०२५ रोजी होणा-या ध्वजदिन निधी संकलन शुभारंभ कार्यक्रमात राज्यपालांच्या स्वाक्षरीचे प्रशस्तीपत्र व स्मृतीचिन्ह देऊन राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या हस्ते सत्कार करण्यात येणार आहे. त्याचबरोबर ८ डिसेंबरला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नागपूर मध्ये ध्वजदिन निधी संकलन शुभारंभ कार्यक्रम होणार असल्याची माहिती सैनिक कल्याण विभाग, पुणे संचालक कार्यालयाच्या वतीने देण्यात आली.

**अनेक व्यक्ती, संस्थांचे योगदान**

सैनिकांप्रती कृतज्ञता म्हणून अनेक स्वयंसेवी संस्था, उद्योग संस्था, संघटना, विद्यार्थी, शिक्षक, शासकीय, खाजगी क्षेत्रातील अधिकारी, कर्मचारी, देशवासीय नागरिक मोठ्या प्रमाणात स्वेच्छेने देणगी देतात.

**निधी जमा करण्यासाठी संपर्क**

-संचालक, सैनिक कल्याण विभाग, पुणे यांच्या नावाने

-बँक ऑफ महाराष्ट्र, शाखा घोरपडी, पुणे Name of Account : FLAG DAY FUND (PUBLIC) Bank A/c No. : 60061347784, IFSC Code-M-HB0000184, MICR Code-411014004 यामध्ये

-रोख, धनादेश अथवा उइड द्वारे ध्वज निधी जमा करता येतो.

-आपल्या नजीकची शाळा, महाविद्यालय किंवा राज्य शासनाचे कार्यालय, तसेच प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात निधी देता येतो.

-सशस्त्र सेना ध्वजदिन निधीसाठी दिलेली संपूर्ण रक्कम आयकर कायदा १९६१ कलम ८० जी (५) (vi) अन्वये करमुक्त आहे. त्यासाठीचे आयकर सुटीचे प्रमाणपत्र आवश्यतेनुसार संबंधित जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय किंवा सैनिक कल्याण विभाग, पुणे येथून दिले जाते.

**संकल्प एक - योगदान हजारोंचे**

तहानभूक विसरुन, कुटुंबापासून दूर.. देशाच्या सीमेवर तैनात असलेले सैनिक हे ऊन, वारा पाऊस, थंडीत मृत्यूच्या छायेत दररोज झुंजतात.. ते केवळ कर्तव्य म्हणून नाही, तर देशसेवेचे व्रत पाळण्यासाठी. देशाच्या संरक्षणासाठी सर्वस्व पणाला लावणाऱ्या सैनिकांच्या आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या कल्याणासाठी वापरण्यात येणाऱ्या सशस्त्र सेना ध्वज दिन निधीमध्ये अमूल्य योगदान देणे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. प्राण पणाला लावून देशाचे रक्षण करणाऱ्या सैनिकांप्रती कृतज्ञतेची भावना केवळ शब्दांनी नव्हे तर कृतीतून व्यक्त करण्याची संधी म्हणजे ध्वज दिन. ध्वज दिन निधी संकलनासाठी सन २०२५ सालासाठी ४० कोटी निधी संकलित करण्याचे उद्दिष्ट महाराष्ट्र राज्यासाठी आहे. चला तर मग.. सशस्त्र सेना ध्वज दिना निमित्त आपल्या सैनिकांना सलाम करुया.. ध्वज दिन निधीमध्ये आपला मोलाचा हातभार लावूया..!

**-वृषाली मिलिंद पाटील.**
सहायक संचालक (माहिती)
विभागीय माहिती कार्यालय कोल्हापूर

## बदलते तंत्रज्ञान

# एआय फीचर्ससह रेडमी १५सी भारतात लॉन्च

चायनीज टेक कंपनी रियलमीने बजेट सेगमेंटमध्ये नवीन १५सी स्मार्टफोन लॉन्च केला आहे.



हे रियलमी C७५चे अपडेटेड व्हर्जन आहे. नवीन फोन मिलिटरी ग्रेड सर्टिफिकेशन आणि IP69K रेटिंगसह आला आहे. म्हणजे ६ मीटर खोल पाण्यात पडल्यास आणि हाय-प्रेशर वॉटर जेटने पाणी मारल्यास देखील फोनला काहीही होणार नाही.

कंपनीचा दावा आहे की, १% बॅटरीवर फोन ९ तासांचा स्टँडबाय बॅकअप देऊ शकतो आणि ४० मिनिटांपर्यंत कॉलिंग करता येते.

फोन पातळ आणि हलक्या डिझाइनचा आहे, जो एका हाताने सहज वापरता येतो. फोनचे वजन २१५ ग्रॅम आहे, जे दीर्घकाळ वापरासाठी आरामदायक बनवते.

फोन प्लास्टिक बॅक पॅनलसह, मिलिटरी ग्रेड प्रमाणित आहे, त्यामुळे तो २ मीटरपर्यंतच्या पडझडीलाही सहन करू शकतो असा दावा केला जातो.

फोन धूळ, पाणी आणि हाय-प्रेशर वॉटर जेटपासूनही सुरक्षित आहे. याची ६ मीटरपर्यंत पाण्यात ३० मिनिटे ठेवून चाचणी करण्यात आली आहे. फोन दोन कलर ऑप्शनसह आला आहे. यात पीकॉक ग्रीन आणि पॅरोट पर्पल कलरचा समावेश आहे.

डिस्प्ले: फोनमध्ये एलसीडी पॅनलवर बनवलेला ६.८ इंचाचा डिस्प्ले देण्यात आला आहे, जो १४४Hz रिफ्रेश रेटवर काम करतो.

पॉवर बॅकअप: फोनची सर्वात मोठी यूएसपी म्हणजे त्याची मोठी बॅटरी आहे. ही टायटॅनियम बॅटरी आहे, जी ६ वर्षांच्या बॅटरी हेल्थसह आली आहे. कंपनीचा दावा आहे की, पूर्ण चार्ज केल्यावर यात २२ तासांपर्यंत ऑनलाइन व्हिडिओ स्ट्रीमिंग वेळ मिळू शकतो. याव्यतिरिक्त, फक्त १% बॅटरी शिल्लक असतानाही हा फोन ९ तास चालेल.

कॅमेरा: फोटोग्राफीसाठी Realme C85 च्या मागील पॅनलवर LED फ्लॅश ड्युअल रियर कॅमेरा सपोर्ट देण्यात आला आहे. यात ५० मेगापिक्सेल Sony IMX८५२ सेन्सर देण्यात आला आहे, जो सेकंडरी लेन्ससोबत काम करतो. सेल्फी आणि व्हिडिओ कॉलिंगसाठी ८ मेगापिक्सेलचा फ्रंट कॅमेरा मिळतो.

# नर्तक व नृत्य दिग्दर्शक उदय शंकर

## निमित्त



जागतिक कीर्तीचे भारतीय नृत्याकार उदय शंकर यांचा जन्म ८ डिसेंबर १९०० रोजी पूर्वीच्या कलकत्ता येथे झाला. वयाच्या अठराव्या वर्षी चित्रकलेच्या अभ्यासासाठी ते इंग्लंडला रवाना. तेथे त्यांनी केलेले नृत्याचे काही कार्यक्रम पाहून जगद्विख्यात रशियन नर्तिका आन्न पाव्हलॉव्ह प्रभावित झाली आणि तिने उदय शंकर यांना नृत्यकलेसाठी प्रवृत्त केले.

पाव्हलॉव्हच्या पथकाबरोबर उदय शंकर यांनी विविध देशांचा दौरा केला. दीड वर्षानंतर ते पॅरिसला आले. तेथे त्यांनी वेगवेगळ्या विशेषतः अतिपूर्वे कडील संस्कृतींचा आणि कलांचा सखोल अभ्यास केला. नृत्याचे अनेक कार्यक्रम पाहिले. या निरीक्षणातून त्यांची कला आकार घेत होती. त्यानंतर ते इंग्लंडमध्ये आले. मादाम सिमकी या आपल्या फ्रेंच शिष्येबरोबर त्यांनी स्वतंत्र कार्यक्रम सुरू केले. परदेशात असताना त्यांनी भारताला वारंवार भेटी दिल्या आणि भारतीय नृत्याचा व्यासंग वाढवला. भारतीय लोकनृत्यांची त्यांना विशेष आवड आहे. स्वतःच्या नृत्यशैलीला समुचित पदलालित्य आणि मुद्राभिनय यांची जोड देऊन ही कला त्यांनी पाश्चात्यांसमोर आणली. 'उदय शंकर म्हणजेच भारतीय नृत्य'असे समीकरण पाश्यात्य देशांत रूढ झाले.

भारतात आल्यानंतर (१९३८) अलमोडा येथे उदय शंकर यांनी इंडिया कल्चर सेंटरची स्थापना करून अभिजात भारतीय नृत्ये शिकण्याची सोय केली. त्यांच्या लेबर अँड मशिनरी, द र्हिदम ऑफ द लाइफ, सामान्यक्षती यांसारख्या बॅलेंनी अमाप लोकप्रियता मिळवली. नृत्यांच्या कार्यक्रमात नावीन्यपूर्ण कल्पना, रंगमंचाचा चातुर्यपूर्ण वापर आणि धंदेवाईक सफाई या गोष्टी यांनी आणल्या. त्यांचे विषय सद्यःस्थितीशी निगडीत असत. कार्यक्रमांची आखणी योजनाबद्ध असे. तसेच निर्मितिमूल्येही उच्च दर्जाची असत. कुठल्याही एका नृत्यप्रकाराशी एकनिष्ठ न राहिल्याचा व शास्त्रोक्त नृत्यात स्वतःच्या कल्पनांनुसार बदल केल्याचा आरोप त्यांच्यावर झाला. पाश्चात्य आणि पौर्वात्य नृत्यांचा त्यांच्यावर प्रभाव होता. अतिपूर्वेची नृत्ये आणि युरोपातील अभिव्यक्तिवादी संप्रदायाचा या संदर्भात विशेषत्वाने उल्लेख करावा लागतो. पण ह्यामुळे त्यांचे नृत्य हिणकस न होता त्याला स्वतःचे असे आगळे वैशिष्ट्य प्राप्त झाले होते.

पारंपरिक नृत्यांद्वारे आधुनिक समस्यांचा अर्थपूर्ण आविष्कार करण्याचे त्यांचे ध्येय होते. तिमिर बरन या संगीतज्ञाच्या मदतीने त्यांनी नृत्याच्या संगीतातही आमूलाग्र बदल घडवले.पण हे प्रयोग करत असताना त्यांनी भारतीय नृत्याचा आत्मा कधी गमावला नाही. त्यांनी स्वतःची वेगळी अशी नृत्यशिक्षणपद्धती सुरू केली. १९५९मध्ये उदय शंकर यांना 'संगीत नाटक अकादमी' चा पुरस्कार लाभला. कल्पना नावाचा नृत्यप्रधान चित्रपट त्यांनी निर्माण केला. भारतीय नृत्यपरंपरेत त्यांनी आधुनिक बॅले नृत्याचा समावेश केला. भारतीय नृत्याला आधुनिक तंत्रांनी समृद्ध करणारा कलावंत म्हणून उदय शंकर यांची कामगिरी नृत्याच्या इतिहासात महत्त्वपूर्ण आहे. **-पद्मिनीराजे पटवर्धन**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# हिवाळ्यात उदासपणा का जाणवतो?

सध्या हिवाळा सुरू झाला आहे. सगळीकडे थंड वातावरण आणि गारवा जाणवतोय असं म्हणतात. हवामान बदलामुळे माणसाच्या शरीरावर खूप खोलवर परिणाम होतो आणि हे खरंय, पण तुम्हाला माहिती आहे का? ऋतू बदलांमुळे माणसाच्या मूडवरसुद्धा त्याचा परिणाम होतो. त्यामुळे हिवाळ्यात आपल्याला अनेकदा उदास वाटते.



डेहराडून येथील थ्रिविंग माइंडच्या संस्थापक मानसोपचारतज्ज्ञ डॉ. अंकिता प्रियदर्शनी यांच्या हवाल्याने माहिती दिली. त्या सांगतात, सिझनल इफेक्टिव्ह डिसऑर्डरमुळे उदासपणा जाणवतो. अशावेळी व्यक्तीमध्ये अनुवांशिक आणि पर्यावरणीय घटक खूप महत्त्वाची भूमिका बजावताना दिसून येतात. नैराश्य येण्यापूर्वीची स्थिती असो किंवा हार्मोन्स असंतुलित होणे, याशिवाय वातावरणातील बदलांमुळे आपल्याला उदासपणा जाणवू शकतो.

मेंदूतील सेरोटोनिन हार्मोन व्यक्तीला आनंदी ठेवण्यास मदत करतात, पण हिवाळ्यात सूर्यप्रकाश कमी होतो, त्यामुळे आपल्या दैनंदिन शारीरिक प्रक्रियांवर आणि या सेरोटोनिन पातळीवर त्याचा परिणाम होतो. त्यामुळे आपल्याला उदास वाटते आणि नैराश्य जाणवते. त्या पुढे सांगतात, सूर्यप्रकाशाच्या कमतरतेमुळे मेलाटोनिन हार्मोन आणि व्हिटॅमिन डी ची पातळी घसरते, ज्याचा थेट परिणाम मूडवर होतो. सूर्यप्रकाश एक महत्त्वाचा घटक असून संवेदनशीलतेवर परिणाम जाणवतो.

भरपूर सूर्यप्रकाश घ्या किंवा कृत्रिम प्रकाशात राहा, यामुळे तुमच्या दररोजच्या शारीरिक प्रक्रिया सुरळीत राहतील. याशिवाय हिवाळ्यात थंड ठिकाणी जाणे टाळा. वातावरण गरम राहील अशा ठिकाणी राहा. दिवसभर घराबाहेर वेळ घालवण्याचा प्रयत्न करा. दिवसा थोड्याफार सूर्यप्रकाशात चाला. कामाच्या ठिकाणी किंवा घरात खिडकीजवळ बसा, ज्यामुळे तुम्हाला नैसर्गिक प्रकाश मिळू शकतो.

जर तुम्हाला पुरेसा सूर्यप्रकाश मिळत नसेल तर व्हिटॅमिन डी समाविष्ट असलेला आहार घ्या. यासाठी तुम्ही जवळच्या तज्ज्ञांशी संपर्क करू शकता आणि त्यांचा सल्ला घेऊ शकता.

शारीरिक क्रिया सुरळीत ठेवण्यासाठी नियमित झोपा आणि तुमची दिनचर्या बनवा. रात्री सात ते आठ तास चांगली झोप घ्या.

हिवाळ्यात आळशीपणा दूर करा. घरी व्यायाम, योगा आणि डान्स करा. यामुळे शारीरिक हालचाली होतील. व्यायामामुळे तुमचा मूड सुधारू शकतो. मित्र-मैत्रिणी आणि कुटुंबाबरोबर वेळ घालवा, पण काही प्रकरणांमध्ये औषधांची गरज भासू शकते.

# शेती जगविण्यासाठी मातीचे संवर्धन अपरिहार्य -डॉ. भरत वाघमोडे

**कर्जत : रामप्रहर वृत्त**

मातीला जिवंत परिसंस्था मानून तिचा ऱ्हास टाळणे, आरोग्य शाश्वत ठेवणे, सुपीकता, उत्पादकता टिकवून ठेवणे आवश्यक असल्याने माती व्यवस्थापनाच्या पध्दती अवलंबविणे गरजेचे आहे.शेती जगविण्यासाठी मातीचे संवर्धन अपरिहार्य आहे ,असे प्रतिपादन प्रादेशिक कृषी संशोधन केंद्र, कर्जतचे सहयोगी संशोधन संचालक डॉ.भरत वाघमोडे यांनी येथे केले. संशोधन केंद्राच्या प्रशिक्षण सभागृहात थायलंडचे राजे दिवंगत भूमीबोल अदुल्यदेज यांची जयंती ' जागतिक मृदा दिन ' म्हणून साजरी करण्यात आली.त्यावेळी अध्यक्षीय मार्गदर्शन करताना ते बोलत होते.




ते म्हणाले की, मृदा ही आपली जननी आहे.मृदाच्या महतीची जाणीव प्रत्येकाला असायला हवी.मातीची निर्मिती होण्यास शेकडो वर्षे लागतात म्हणून तिची काळजी घेणे काळाची गरज आहे.शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी विकू नये.शेती किफायतशीर होण्याचे मार्ग उपलब्ध असून आता व्यावसायिक शेतीकडे वळण्याची गरज आहे, असे ते म्हणाले.शेतकऱ्यांनी मागणी केल्यास रब्बीसाठी बियाणे उपलब्ध करून देऊ, अशी ग्वाही त्यांनी दिली.संशोधन केंद्राला गतिमान भात पैदास प्रकल्प मंजूर झाल्याने नव्या तंत्रज्ञानाने शेतकऱ्यांच्या गरजेनुरूप भात बियाणे चार ते पाच वर्षात उपलब्ध करू, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

प्रगतशील शेतकरी चंद्रकांत मांडे यांनी वातावरणातील बदल व शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या समस्यांचा उहापोह करीत शासकीय धोरणांची अंमलबजावणी तळमळीने करण्याची गरज प्रतिपादित केली.यावेळी कृषिविद्यावेत्ता डॉ. विजय सागवेकर, वनस्पती शरीरक्रियाशास्त्रज्ञ डॉ. मीनाक्षी केळुस्कर,कनिष्ठ संशोधन सहायक महेशकुमार,प्रगतशील शेतकरी निलिकेश दळवी व हेमंत कोंडीलकर यांनी मनोगत व्यक्त केले.

प्रास्ताविकात कृषी विस्तार शिक्षण शास्त्रज्ञ डॉ. रवींद्र मर्दाने यांनी शेतकऱ्यांचे मसिहा थायलंडचे राजे दिवंगत भूमीबोल अदुल्यदेज व जागतिक मृदा दिनाची ऐतिहासिक पार्श्वभूमी विशद केली.ते म्हणाले की,जगभरातील माणसांच्या एकूण अन्नाच्या गरजांपैकी ९५ टक्के गरजा मातीवर अवलंबून आहेत.मातीच्या ऱ्हासामुळे दरवर्षी ४०० बिलियन डॉलरचे नुकसान होत आहे.मातीच्या धुपामुळे ७.६ दशलक्ष टन तृणधान्याचे नुकसान होत आहे.हा ऱ्हास असाच सुरू राहिल्यास नजीकच्या काही वर्षात अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या उपजीविकेचे साधन हिरावले जाऊन त्यांना बेरोजगारी आणि उपासमार या समस्यांना तोंड द्यावे लागेल.त्यामुळे मातीचे शाश्वत व्यवस्थापन करणे गरजेचे आहे.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ. रवींद्र मर्दाने यांनी केले.कार्यक्रमाला तालुक्यातील शेतकरी कर्मचारी उपस्थित होते.

## हवालदाराने माणुसकी जपत वृद्धेला केले सहकार्य

**माणगाव : प्रतिनिधी**



माणगाव शहरात पोलीसांना वाहतूक व्यवस्थापनाची जबाबदारी पार पाडताना अनेक प्रसंगांना सामोरे जावे लागते. शनिवार दिनांक ६ डिसेंबर रोजी दुपारी माणगाव शहरातील मुंबई-गोवा महामार्गाच्या कडेला शुभारंभ मार्केटजवळील झाडाच्या सावलीखाली एक भूकेली वृद्ध आजी एकटक बसलेली दिसली. डच्युटी सांभाळताना शिवराज बांडे यांच्या नजरेत त्या आजी आल्या. त्यांनी पुढे होऊन प्रेमाने विचारले, आजी, भूक लागली का? त्या क्षणी आजींचे डोळे पाणावले. हळू आवाजात त्यांनी सांगितले, भाकरी चावत नाही रे बाळा थोडीशी भजी खाईन. या एका वाक्याने बांडे यांच्या मनाला चटका बसला.

क्षणाचाही विलंब न करता त्यांनी स्वतः पुढाकार घेत आजीसाठी गरमागरम भजी आणि पाण्याची बाटली आणली. त्यानंतर आजींच्या चेहर्यावरचा कृतज्ञतेचा हास्यभाव पाहून बांडे यांनाही भावूक झाल्याशिवाय राहिले नाही. या घटनेबद्दल हवालदार शिवराज बांडे म्हणाले, ही पोस्ट प्रसिद्धीसाठी नाही तर भूक ही सर्वात मोठी वेदना आहे. एखाद्याला मदत करता आली, एवढीच माझी इच्छा. आजीची भूक भागली, म्हणजे माझी ड्युटीसुद्धा सार्थक झाली. त्यांच्या या कृत्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## हिवाळी सुट्ट्यांसाठी मध्य रेल्वेचे १४ विशेष गाड्यांचे नियोजन

**रोहे :** मध्य रेल्वेने विविध सण आणि हिवाळी सुट्ट्यांसाठी १४ विशेष ट्रेन ऑन डिमांड चालवण्याचे नियोजन केले आहे. प्रवाशांच्या फायद्यासाठी विविध ठिकाणांदरम्यान अनेक सेवांचे नियोजन केले आहे. या विशेष गाड्यांचे मडगाव, नागपूर, बेंगळुरू, लखनौ, गोरखपूर आणि हजरत निजामुद्दीन (दिल्ली) या विविध ठिकाणांचा यांत समावेश आहे. या गाड्यांतून जलद आणि आरामदायी प्रवास सुनिश्चित केला जाईल. या विशेष गाड्यांमध्ये प्रथम वातानुकूलित, वातानुकूलित द्वितीय, वातानुकूलित तृतीय, शयनयान आणि सामान्य द्वितीयसह सर्व वर्गांचा समावेश असेल, जे सर्व विभागातील प्रवाशांना सेवा देतील.

## साई भंडाऱ्यात सुफियाना कव्वालीने भाविक मंत्रमुग्ध

**पेण : प्रतिनिधी**

ओम साई पदयात्रा मित्र मंडळतर्फे भव्य साई भंडारा साई सहारा रेस्टॉरंट पेण येथे भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. जिल्ह्यातील हजारों साई भक्तांची उपस्थिती असलेल्या या कार्यक्रमासाठी दिल्लीवाले प्रसिद्ध गायक सुफि ब्रदर्स यांनी गायनाचा कार्यक्रम भक्तिमय वातावरणात सादर केला. दिवाना तेरा आया, बाबा तेरी शिर्डी में या संपूर्ण देशात गाजलेल्या गाण्याने पेणसह रायगड जिल्ह्यातील हजारों साई भक्त मंत्रमुग्ध झाले.

साई भंडारा कार्यक्रमाला सायंकाळी ६.०० वाजता श्री साई भजनाने सुरुवात होऊन सायंकाळी ७.३० वाजता हजारो महिला-पुरुष व आबालवृद्ध साई भक्तांच्या उपस्थितीत बाबांची धूप आरती झाली. तर रात्री ९.०० वाजता श्री साई भंडान्यानिमित्त महाप्रसाद संपन्न झाला.

विशेष आकर्षण म्हणून हम्सर हयात, अतहर हयात निजामी व सुफि ब्रदर्स (दिल्लीवाले) यांनी भजनसंध्या व ऑर्केस्ट्रा सादर करत माझे साई बाबा, साई का दीदार, चढता सूरज धीरे धीरे, दिवाना तेरा आया बाबा तेरी शिर्डी में अशी अनेक गाणी गात भक्तिरसाचा अनुभव दिला.



**महाड : ऐतिहासिक महाड क्रांतीभूमीत महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९व्या महापरिनिर्वाण दिनी राज्याचे मंत्री भरत गोगावले यांनी चवदार तळे येथे येऊन महामानवाला अभिवादन केले. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया, बहुजन महासंघ, रिपब्लिकन सेना, भारिप बहुजन महासंघ, अशा अनेक संघटनांच्या प्रतिनिधींनीदेखील या ठिकाणी अभिवादन केले. तालुक्यासह अनेक ठिकाणाहून आलेल्या भीम ज्योतींचे स्वागत येथे करण्यात आले.**

## माणगावमध्ये वारंवार वाहतूक कोंडी; प्रवासी, नागरिकांसह पोलीसही हैराण

माणगाव : प्रतिनिधी

मुंबई-गोवा महामार्गाचे काम अद्यापही पूर्णत्वास न गेल्याने तसेच माणगाव आणि इंदापूर येथील बायपास मार्ग सुरू न झाल्याने संपूर्ण परिसरात वाहतूक कोंडीची समस्या दिवसेंदिवस तीव्र होत आहे. माणगाव, इंदापूर आणि लोणेरे शहरांमध्ये वाहनांची प्रचंड गर्दी होत असून त्याचा प्रचंड फटका प्रवासी, नागरिक आणि पोलिसांना बसत आहे. सततच्या कोंडीमुळे सर्वसामान्य जनता अक्षरशः हैराण झाली आहे.



शनिवार,दि.६ डिसेंबर रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त सार्वजनिक सुट्टी, लग्नसमारंभांची संख्या, शासकीय कार्यालये तसेच शाळा-कॉलेज बंद असल्याने दिवसभर वाहनांची प्रचंड वर्दळ पाहायला मिळाली. परिणामी माणगाव शहरातील अनेक ठिकाणी वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली. रस्त्यातील कोंडी टाळण्यासाठी वाहनचालकांनी विविध पर्यायी रस्त्यांचा व शॉर्टकट मार्गांचा अवलंब केला. त्यामुळे खरवली, निजामपूर, रायगड रोड, बामणोली, मोरबा, दहिवली, गोरेगाव आदी भागातील अरुंद रस्त्यांवरही वाहनांची मोठी गर्दी झाली.

नेहमीपेक्षा चारपट वाहतूक वाढल्याने या परिसरातील नागरिकांचाही त्रास अधिक वाढला. कोंडी सुरळीत करण्यासाठी पोलिस कर्मचारी दिवसभर रस्त्यावर तैनात राहून अथक परिश्रम घेत होते. मात्र उपलब्ध पोलीस कर्मचारी अपुरे असल्याने काही ठिकाणी वाहतूक पूर्णपणे थांबली तर काही ठिकाणी वाहनांच्या रांगा किलोमीटरपर्यंत वाढल्या.

यामुळे पोलिसांवरही प्रचंड मानसिक ताण निर्माण होत आहे.सुट्टीच्या दिवशी आणि गर्दीच्या काळात अतिरिक्त पोलिस बंदोबस्त वाढवावा, वाहतूक नियोजनात सुधारणा करावी आणि लवकरात लवकर बायपास मार्ग सुरू करण्याची मागणी जोर धरत आहे.

## अश्व एज्युकेशन पॅरामेडिकलच्या विज्ञान प्रदर्शनात ३० प्रतिकृती सादर

**पेण : प्रतिनिधी**

विज्ञान प्रदर्शनातुन विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्तेची जाणीव होते. त्यांची आवड रुची अधिक स्पष्ट होते. येथेही विद्यार्थ्यांनी जिवशास्त्रच्या आधारावर मांडलेल्या प्रतिकृती एकापेक्षा एक सरस आहेत. त्याची केलेली मांडणी उत्तम होती असे वक्तयव विज्ञान प्रदर्शनाचें उदघाटक प्राचार्य गलांडे सर यांनी केले.



अश्व एज्युकेशन पॅरामेडिकल कॉलेज पेणच्या वतीने विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनात विद्यार्थ्यांने ३० मॉडेल मांडण्यात आले होते. ज्याद्वारे मानवी शरीराची रचना, कार्य याबाबत अतिशय सुरेख प्रतिकृती तयार करण्यात आल्या होत्या. या विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन न्यू इंग्लिश स्कूल जोहेचे प्राचार्य उत्तम गलांडे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांच्यासोबत श्री. करांडे सर, श्री.पटाईत, श्री गवळी व रेश्मा पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. पाहुण्याचे स्वागत प्राचार्य अश्विनी राजेश राठोड मॅडम यांनी केले. या विज्ञान प्रदर्शनासाठी कॉलेजचे शिक्षक श्रीमतीप्रिया मिस्त्री ,श्रुतिकाकोठेकर ,सविता उंबरटकर यांनी मेहनत घेतली.

## चौल भोवाळेत दत्त पालखी सोहळा उत्साहात



**रेवदंडा : प्रतिनिधी**

चौल भोवाळे पर्वतवासी श्री दत्त जयंती उत्सव सालाबादप्रमाणे उत्साहात साजरा होत असताना रात्री १२ वाजल्यापासून भक्तमंडळींनी दर्शनासाठी गर्दी केली होती.

पर्वतवासी श्री दत्त मुखवटयाचा मान चौल पाचकळशी माळी समाजाचा असतो. परंपरेनुसार श्री दत्त मुखवटा पालखी सोहळा थेरोंडा पानसेवाडी येथील दत्तात्रेय नाईक यांच्या घरातून सकाळी ७ वाजता वाजतगाजत भक्तीमय वातावरणात निघाला. या वेळी घराघरातून श्री दत्त मुखवट्याचे दर्शन ग्रामस्थ मोठ्या घेत होते.

सोहळ्यास पाठारे क्षत्रीय समाज पाचकळशी माळी समाजाचेमाजी अध्यक्ष सुरेश घरत-कोटकर, विद्यमान अध्यक्ष रमेश म्हात्रे, उपाध्यक्ष बळीराम म्हात्रे, माजी उपाध्यक्ष अनंत घरत, वधू वर सूचक कार्यकारी अध्यक्ष नरेश म्हात्रे, विनोद घरत, बळीराम नाईक, किशोर घरत, किशोर नाईक, सुभाष घरत, अक्षय म्हात्रे, माजी अध्यक्ष वामन घरत, प्रभाकर नाईक, मोहन पराड, सूर्यकांत म्हात्रे आदी पाचकळशी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **श्री. रमेश मारुती थोरात** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

**मिळकतीचे वर्णन : विंधणे (५५३३२४)**
**(PU-ID : 29383143337), तालुका-उरण, जिल्हा-रायगड**

| गट क्रमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| २५३/१ | १ | ०.९५.३० <br> पो.ख. ०.११.९० <br> **एकुण १.०७.२०** | १०.१२ |
| पैकी श्री. रमेश मारुती थोरात यांचे नावे असलेले खालील क्षेत्र | | | |
| खाते क्र.१०२४४ | | ०.१८.१० <br> पो.ख. ०.१९.९० <br> **एकुण ०.३०.००** | २.४० |
| श्री. रमेश मारुती थोरात यांच्या मालकीचे असलेले एकुण क्षेत्र ०.३०.०० गुंठे | | | |

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०८/१२/२०२५

**सही/-**
**ॲड. निलेश बा. झंजाड**

बी-१०४ सफायर सी.एच.एस. भूखंड क्रमांक-३३/३४, सेक्टर २२, कामोठे, तालुका पनवेल, जिल्हा-रायगड ४१०२०६. मो. क्र. ९९२०४७५८०१

### महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

<u>मुदतवाढ सूचना</u>

**ई निविदा सूचना क्र. ५५/२०२५-२०२६ (मुंबई) करीता**

दिनांक ०४/११/२०२५ रोजी दैनिक नवराष्ट्र, मुंबई, दैनिक आपलं महानगर, मुंबई, दैनिक रामप्रहर, रायगड, दैनिक हिंदूस्थान टाईम्स, मुंबई, दैनिक मिड डे, मुंबई, दैनिक एक्टीव टाईम्स, मुंबई, दैनिक प्रातःकाल, मुंबई, दैनिक भास्कर, मुंबई या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामांकरीता ई निविदा शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ई निविदा उपलब्धता, कंत्राटदारांचे प्रश्न संकेतस्थळावर नोंदविणे, पुर्व अहर्ता बैठक, कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा बाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचेनांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | दिघी बंदराभिमुख औद्योगिक क्षेत्र (डिपीआयए)... महाराष्ट्र राज्यातील दिघी बंदर औद्योगिक क्षेत्र, क्लस्टर क्रमांक ५ तालुका माणगाव व रोहा, जिल्हा रायगड येथे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाद्वारे आगामी अल्ट्रा-मॉडर्न इको-फ्रेंडली औद्योगिक उद्यानाच्या इक्विटी इन्फ्युजन, विकास, ऑपरेशन, देखभाल व व्यवस्थापनासाठी भारतीय/आंतरराष्ट्रीय विकासकांकडून बांधा, वापरा व हस्तांतरीत करणे (पीपीपी) तत्वावर "सामाजिक भागीदाराची निवड" करण्यासाठी प्रस्तावाची विनंती. | ₹ ०.०० |

उपरोक्त कामांकरीता निविदा प्रपत्र दिनांक १९/०१/२०२६ पर्यंत शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक २२/१२/२०२५ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर नोंदवावेत. पुर्व अहर्ता बैठक दिनांक २३/१२/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता म.औ.वि.म.,मुख्यालय, उद्योग सारथी, महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पुर्व), मुंबई ४०० ०९३ या कार्यालयात आयोजित करण्यात आली आहे. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक २९/१२/२०२५ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

ज्या निविदाधारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करुन किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

## नवी मुंबईत होणार देशातील पहिला
# इनडोअर लाईव्ह एन्टरटेनमेन्ट अरेना

**नवी मुंबई : बातमीदार**

दूरदर्शी नियोजनाद्वारे व विशिष्ट उद्देशाने विकसित करण्यात आलेले नवी मुंबई हे देशाच्या नगर नियोजनाला नवीन दिशा देणारे शहर ठरले आहे. भविष्यातील शहर म्हणून संकल्पित असलेली नवी मुंबई वर्तमानातील शहर म्हणून दिमाखाने झळकत आहे. हे परिवर्तन घडवून आणण्यासह देशातील थेट करमणूक क्रांती (live entertainment revolution)चा केंद्रबिंदू म्हणून नवी मुंबईला नावारूपाला आणत असल्याचा सिडकोला सार्थ अभिमान आहे.



या संदर्भातील एक महत्त्वाचे पाऊल म्हणून देशातील पहिला आयकॉनिक मल्टिपर्पज इनडोअर लाईव्ह एन्टरटेनमेन्ट अरेना नवी मुंबईमध्ये उभारण्यासाठी सिडकोतर्फे स्वारस्य अभिव्यक्ती जारी करून प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. स्वारस्य अभिव्यक्ती दस्तऐवज ९ डिसेंबर २०२५ पासून ऑनलाईन उपलब्ध असणार असून निविदा सादर करण्याची अंतिम मुदत ३१ डिसेंबर २०२५ रोजी संध्याकाळी ५ वाजेपर्यंत (भारतीय प्रमाण वेळ) आहे.

न्यूयॉर्क येथील मॅडिसन स्क्वेअर गार्डन आणि लंडन येथील ओटू अरेना या बहुउद्देशीय नाट्यगृहांपासून प्रेरणा घेऊन विकसित करण्यात येणारा हा प्रकल्प देशातील करमणूक पायाभूत सुविधांमध्ये नवीन मानदंड प्रस्थापित करणार आहे. रसिकांना मंत्रमुग्ध करणाऱ्या संगीतसभा, आंतरराष्ट्रीय क्रीडाविषयक कार्यक्रम, भव्य स्तरावरील सांस्कृतिक महोत्सव आणि आभासी अनुभव (immersive productions) यांच्या आयोजनाकरिता २०,००० प्रेक्षकांसाठी आसन व्यवस्था आणि २५,००० उभे प्रेक्षक इतकी क्षमता या ठिकाणी असणार आहे. यामुळे हा देशातील पहिला जागतिक दर्जाचा व भव्य क्षमता असणारा इनडोअर अरेना असणार आहे.

नवी मुंबईतील पायाभूत सुविधांचा विकास अत्यंत वेगाने होत असल्याने जागतिक पातळीवरील करमणूक कार्यक्रमांचे यजमानपद भूषवण्यासाठी नवी मुंबई सक्षम झाली आहे. अटल सेतू ट्रान्स-हार्बर लिंक, हाय स्पीड रेल्वे मार्ग आणि नवी मुंबई मेट्रो यांद्वारे अखंड आणि वेगवान कनेक्टिव्हिटी सुनिश्चित झाली आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाद्वारे करमणूक व्यवस्थापन (लॉजिस्टिक्स), आंतरराष्ट्रीय पातळीवरील कलाकारांकरिता परिवहन आणि प्रसार माध्यम उत्पादन क्षमता यांमध्ये क्रांतिकारी परिवर्तन घडून येणार आहे. नेरूळ जेट्टीद्वारे पर्यटन, जलवाहतूक आणि चित्रपट निर्मितीच्या संधींमध्ये वाढ होणार आहे.

फिफा मानकांचे अनुपालन करणाऱ्या चार खेळपट्ट्या आणि ४,००० आसन क्षमतेचे स्टेडियम असणारे खारघर येथील सेंटर ऑफ एक्सलन्स आणि १८ होल्सचे खारघर व्हॅली गोल्फ कोर्स यांनी नवी मुंबईचे क्रीडा व करमणूक क्षेत्रातील स्थान अधिक बळकट केले आहे. आगामी मेडि सिटी, एज्यु सिटी आणि एरो सिटी प्रकल्पांद्वारे नवी मुंबईचे एकात्मीक नगर विकास प्रारूप अधिक उठावदार होणार आहे.

> **या प्रकल्पाद्वारे जागतिक दर्जाची करमणूक भारतीयांकरिता खुली होऊन कलाकार, उद्योजक आणि स्थानिक समूहांकरिता व्यापक प्रमाणावर संधी उपलब्ध होणार आहेत व नवी मुंबईचे जागतिक नकाशावरील स्थान अधिक बळकट होणार आहे. प्रत्येक टप्प्यावर कल्पनांना मूर्त रूप देण्यासाठी असलेली सिडकोची कटिबद्धता अधोरेखित होत आहे.**
> **-विजय सिंघल,** उपाध्यक्ष, सिडको

### सांस्कृतिक व आर्थिक चळवळीची सुरुवात

हा उपक्रम केवळ अरेना विकसित करण्यापुरता मर्यादित नसून सांस्कृतिक व आर्थिक चळवळीची ही सुरुवात आहे. या प्रकल्पाद्वारे मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती, पर्यटनाला चालना, नवीन उद्योगांच्या संधींची निर्मिती होणार असून देशातील थेट करमणूक, जागतिक कार्यक्रम आणि आभासी अनुभव प्रदान करणारे अग्रणी शहर म्हणून नवी मुंबईचे देशामध्ये स्थान निर्माण होणार आहे.

# उरणमध्ये तंबाखूमुक्ती अभियान



**उरण : वार्ताहर, बातमीदार**

उरण येथील द्रोणागिरी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, उरण येथे इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयाच्या वतीने 'तंबाखू मुक्ती युवा अभियान ३.०' अंतर्गत जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले

या शिबिरात दातांचे डॉ. संतोष झापकर यांनी विद्यार्थ्यांना तंबाखूजन्य पदार्थांच्या व्यसनाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

डॉ. झापकर यांनी तंबाखूचे विविध प्रकार, त्यातील अपायकारक द्रव्ये आणि तंबाखू सेवनामुळे होणारे मुख कर्करोग, फुफ्फुसांचे विकार, हृदयविकार, दात-हाडांचे नुकसान आदी गंभीर दुष्परिणाम याबाबत विद्यार्थ्यांना माहिती दिली. व्यसनातून मुक्त होण्यासाठी आवश्यक उपाययोजना, समुपदेशनाची गरज आणि आरोग्यदायी जीवनशैली अंगीकारण्याचे महत्त्व यावरही त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

शिबिरास संस्थेतील प्रशिक्षणार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. तंबाखूमुक्त समाज घडवण्यासाठी युवकांनी पुढाकार घेणे आवश्यक असल्याचे मत या वेळी व्यक्त करण्यात आले. संस्थेच्या वतीने. झापकर यांचे मार्गदर्शनाबद्दल आभार व्यक्त करण्यात आले.

या वेळी संस्थेचे प्राचार्य मा.व. पिळ्ले, गट निर्देशक देशमुख, विद्यार्थी आदी उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्र संचालन ए.एस.पाटील यांनी केले. संस्थेच्या वतीने झापकर यांचे आभार मानले.

# ९ डिसेंबरला पेन्शन अदालत

**नवी मुंबई : बातमीदार**


कोंकण विभागातील पेन्शन अदालत दरमहा दुसऱ्या मंगळवारी आयोजित करण्यात येते. या महिन्यातील विभागीय पेन्शन अदालत मंगळवार, ९ डिसेंबर, २०२५ रोजी दुपारी १२ वा. कोकण भवनातील कक्ष क्र. १०६ सामान्य प्रशासन शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय कोंकण भवन येथे आयोजित केली आहे.




या पेन्शन अदालतीमध्ये महसूल विभागातील सेवानिवृत्त शासकीय कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित पेन्शन प्रकरणांच्या अडचणींचे निवारण करण्यात येणार आहे. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या पेन्शन प्रकरणांबाबतच्या तक्रारी असल्यास सदर दिवशी त्याबाबतचे अर्ज स्वीकारले जातील. कोकण विभागातील पेन्शन धारकांनी या पेन्शन अदालतीला उपस्थित राहून पेन्शन विषयी आपले प्रश्न उपस्थित करावे, असे कोकण विभाग प्र.तहसिलदार (सामान्य प्रशासन) नरेश जगताप यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये कळविले आहे.

# पानिपतकार विश्वास पाटील यांचा नवी मुंबईत उद्या जाहीर सत्कार

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**



९९व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष, पानिपतकार जेष्ठ लेखक विश्वास पाटील यांच्या जाहीर सत्काराचे आयोजन यशवंतराव चव्हाण केंद्र, नवी मुंबई व कवी कुसुमाग्रज वाचनालय संस्था, नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार, ९ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता नेरूळ, सेक्टर १९ इथल्या स्टर्लिंग कॉलेज सभागृहात करण्यात आले आहे.

या वेळी जयवंत पाटील लिखित प्रतिष्ठान (पैठण शहराचा इतिहास) या पुस्तकाचे प्रकाशन पानिपतकर विश्वास पाटील व कविवर्य प्रा. अशोक बागवे यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमास नवी मुंबईकर रसिक प्रेक्षकांना उपस्थित राहण्याचे आवाहन यशवंतराव चव्हाण केंद्र नवी मुंबईचे अध्यक्ष प्रमोद कर्नाड व सचिव डॉ . अशोक पाटील यांनी केले आहे.

लेखक जयवंत पाटील हे शिवव्याख्याते म्हणून परिचित असून त्यांनी एक मंच, एक व्याख्याता व एकवीस विषय या व्याख्यानमालेत आतापर्यंत २० व्याख्याने दिली आहेत. त्यांनी लिहीलेल्या पुस्तकात फक्त पैठण शहराचा इतिहास नसून मराठी संस्कृतीचा इतिहास असल्याचे कवी कुसुमाग्रज वाचनालय संस्थेचे कार्यवाह ललित पाठक यांनी सांगितले.

# ओएनजीसी उरण प्लांटतर्फे बुधवारी रक्तदान शिबिर

**उरण : वार्ताहर, बातमीदार**

उरण येथील ओएनजीसी उरण प्लांटच्या वतीने बुधवारी (दि १०) ओएनजीसी द्रोणागिरी भवन उरण येथे सकाळी ७ ते सायंकाळी ६ या वेळेत रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. आयोजक ओएनजीसी स्थानिक लोकाधिकार समिती, ओएनजीसी (डब्ल्यू.ओ.यु.)कर्मचारी संघटना आहे.



ओएनजीसी स्थानिय लोकाधिकार समिती, ओएनजीसी कर्मचारी संघटनेने आयोजित केलेल्या या रक्तदान शिबिरात मुंबई व नवी मुंबई रक्तपेढीचे विशेष सहकार्य लाभणार आहे.

शिबिरास उमेशा सोंदकूर (मुख्य महाव्यवस्थापक सयंत्र व्यवस्थापक उरण), संजीव कुमार मोहन (मुख्य महाव्यवस्थापक (उत्पादन) आधारभूत सेवा, मनिष मेहता (महाव्यवस्थापक वित्त आणि लेखा विभाग), भावना आठवले (महा व्यवस्थापक प्रभारी मानव संसाधन) यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

ओएनजीसी उरण प्लांटचे अनिल देसाई, वरीष्ठ उपाध्यक्ष पराग कदम, कार्याध्यक्ष संदिप गावडे, सरचिटणीस प्रदिप मयेकर, उपाध्यक्ष उज्ज्वेश तुपे सचिव-बाळकृष्ण काशिद सचिव दिलीप आरदाळकर-संघटक सचिव नितीन गवळी यांचे सहकार्य लाभणार आहे.

# मोहोपाड्यात जागतिक दिव्यांग दिन उत्साहात साजरा

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

ग्रुप ग्रामपंचायत वासांबे मोहोपाडा येथे जागतिक दिव्यांग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी ग्रुप ग्रामपंचायत वासांबे सरपंच उमा मुंढे, ग्रामपंचायत अधिकारी वैभव पाटील, ग्रामपंचायत सदस्य, ज्येष्ठ दिव्यांग सदस्य सुभाष खराटे, वासांबे दिव्यांग अध्यक्ष सुनील माळी, दिव्यांग समिती सदस्य रमाकांत मांडे, वैभव बोरकर, तसेच पत्रकार बांधव उपस्थित होते.



या वेळी सरपंच उमा मुंढे यांनी दिव्यांगाच्या समस्या समजावून घेऊन त्याचे निराकारण केले, तसेच N. M. T. बसच्या फेऱ्या वाढविणे, तसेच N. M. T. परिवहन अधिकारी वर्ग यांच्याशी चर्चा व त्यांचे नियम व निकष यांबाबत चर्चा करून N. M. T. T.बस ही वासांबे परिसरातील दिव्यांग बांधवाना प्रवासासाठी मोफत करण्याचे आश्वासन सरपंच उमा मुंढे यांनी दिले आहे.

# चिरनेर येथून विवाहिता बेपत्ता

**उरण : बातमीदार**



उरण येथील चिरनेर गावामधून ३० वर्षांची विवाहिताघरात कुणासही काही न सांगता अचानकपणे बेपत्ता झाल्याने परिसरात खळबळ माजली आहे. या संदर्भात उरण पोलीस शोध घेत आहेत.

या घटनेची खबर तिचे पती हिंदकुमार राजेश कुशवाह यांनी उरण पोलीस ठाण्यात केली आहे. बेपत्ता महिलेचे नाव सवनाबाई हिंदकुमार कुशवाह असून उंची १४५ सेंटी मीटर, रंग गोरा, मजबूत बांधा, नाक सरळ, केस विरळ, डोळे काळे, गोल चेहरा, उजव्या हातावर सवाना असे नाव गोंदवीले आहे. चिरनेर येथील घरांतून जातेवेळी अंगात लाल टीशर्ट व निळी जीन्स परिधान केलेली आहे. या तरुणीचा शोध उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हनिफ मुलाणी यांच्या मार्गदर्शनाखाली उरण पोलीस घेत आहेत. कोणाला सवनाबाई कुशवाह हिच्याबाबत काही माहिती असल्यास, उरण पोलीस ठाण्यात कळविण्याचे आवाहन वरिष्ठ निरीक्षक हनीफ मुलांनी यांनी केले आहे.

# उरण महाविद्यालयात महापरिनिर्वाण दिन




**उरण : रामप्रहर वृत्त**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन अभिवादन कार्यक्रमाच्या रूपाने संपन्न करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाल्मीक गर्जे सर हे कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. तर प्रमुख पाहुणे भूगोल विभाग प्रमुख प्रा. डॉ. ए.के. गायकवाड उपस्थित होते.

डॉ. ए.के. गायकवाड यांनी यानिमित्त भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. तर डॉ. एम.जी. लोणे (इतिहास विभाग प्रमुख) यांनी भारतातील जातीव्यवस्थेची निर्मिती, महात्मा गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यातील वैचारिक संघर्ष व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक समतेचा लढा इत्यादी विषय मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. वाल्मिक गर्जे यांनी बाबासाहेबांचे अप्रकाशित विविध पैलू विविध उदाहरणांच्या साह्याने विद्यार्थ्यांसमोर मांडले. व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडे पाहण्याची सर्वांगीण दृष्टी विकसित करावी असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. एच. के. जगताप यांनी केले. प्रास्ताविक डॉ. दत्ता हिंगमिरे यांनी तर उपस्थितांचे आभार आय.क्यु.ए.सी समन्वयक डॉ.ए. आर. चव्हाण यांनी व्यक्त केले. कार्यक्रमात महाविद्यालयातील ज्येष्ठ प्रा. व्हि.एस. इंदुलकर, प्रा. सौ. ए.आर. कांबळे, डॉ. पराग कारुळकर, प्रा. रियाज पठाण, महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

# चैत्यभूमीकडे मार्गस्थ भीम अनुयायांसाठी अल्पोपहार

**नवी मुंबई : बातमीदार**

भारतरत्न, युगपुरुष, बोधिसत्त्व आणि भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त देशाच्या कानाकोपऱ्यातून लाखो अनुयायी दादर, मुंबई येथील चैत्यभूमी येथे अभिवादनासाठी येत असतात.

या पार्श्वभूमीवर भाविकांच्या सोयीसाठी आमदार मंदा म्हात्रे यांच्या पुढाकाराने तसेच माजी नगरसेवक व भाजपा महामंत्री नवी मुंबई जिल्हा निलेश म्हात्रे यांच्या उपस्थितीत हजारो अनुयायांना सायन-पनवेल रोड वरील सीबीडी बेलापूर ब्रिजखाली दादरकडे प्रस्थान करणाऱ्या मार्गांवर अल्पोपहार वितरण उपक्रम राबविण्यात आला. तसेच उपक्रमांतर्गत दूरदूरहून येणाऱ्या अनुयायांना पाणी, नाश्ता इत्यादींचे वितरण करण्यात आले. अनेक भाविक मंडळी पहाटेपासून प्रवास करत असल्याने या सेवेमुळे त्यांची मोठी गैरसोय टळली.

या वेळी माजी नगरसेवक व भाजपा महामंत्री नवी मुंबई जिल्हा निलेश म्हात्रे यांच्या समवेत माजी भाजपा जिल्हाध्यक्ष सी.व्ही. रेड्डी. बेलापूर मंडळ अध्यक्ष अजय सिंग, मनोहर बाविस्कर, दीपक जोशी, प्रभाकर कांबळे, समीर मनोरे, सीबीडी विभागातील माजी नगरसेवक, नवी मुंबई व्यापारी संघ अध्यक्ष प्रमोद जोशी, तेजस्वीनी म्हात्रे, ज्योती पाटील, आरती राउळ, अलका कामत, मीना ओझा, संजय ओबेरॉय, नितीन सोनावणे, राजू कोळी, नारायण वाघमारे, तसेच मोठ्या संख्येने डॉ. बाबासाहेब साहेबांचे अनुयायी उपस्थित होते.

# पनवेल देवद येथे दत्त जन्मोत्सव उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री शिवगिरी सेवा संस्थान पनवेल यांच्या विद्यमाने गुरुवारी (दि.४) सनातन संकुल, देवद येथे दत्त जन्मोत्सव साजरा करण्यात आला.

श्री शिवगिरी सेवा संस्थान,संस्थापक अध्यक्ष कै. दिलीप उर्फ दादा शंकर खोत यांनी प्रथम मुंबई येथे चाळीस वर्षापूर्वी सुरू केलेला हा दत्त जन्मोत्सव त्यांच्या पश्चात पनवेलमध्ये आजही जवळपास २३ वर्षांपासून सुरू आहे. या उत्सवानिमित्त अनेक धार्मिक कार्यक्रम श्री दिगंबर पांगारकर गुरुजी यांचे पौरोहित्यने करण्यात आले.



मुंबई, ठाणे, सातारा, रत्नागिरी इत्यादी ठिकाणाहून आलेल्या भाविकांनी पालखी सोहळ्याला आवर्जून उपस्थिती लावली. यंदा हा उत्सव मंडळाचे सदस्य सामाजिक कार्यात सदा सहभागी असणारे नवीन पनवेल चे उदय सावंत आणि नेरे येथील रहिवासी असलेले भंडारी समाजाचे सदा हसतमुख कार्यकर्ते सुभाष खोत यांच्या आयोजनाखाली साजरा झाला.

यंदाच्या श्री सत्यदत्त पूजेचा मान कळंबोली येथील हनुमंत जाधव व लीलाताई जाधव या दांपत्याने भूषविला. या उत्सवाच्या पालखी सोहळ्याला कामोठे येथील हिरकणी लेझीम पथक यांची उपस्थिती लक्षवेधक होती. या सर्व कार्यक्रमांची रूपरेखा मंडळाचे विद्यमान अध्यक्ष प्रसाद दिलीप खोत (उद्योजक), सेक्रेटरी शिवानंद प्रभू, खजिनदार मिलिंद पांचाळ आणि ज्येष्ठ सदस्य बाळकृष्ण धामापूरकर काका यांनी केले होते.

# कातळपाड्यात दत्तगुरूंच्या नामाचा गजर

**उरण : वार्ताहर**

चिरनेर कातळपाडा येथे दत्त जयंती उत्सव सोहळा अत्यंत उत्साही आणि धार्मिक वातावरणात साजरा करण्यात आला. यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम सादर करण्यात आले. दत्तगुरूंच्या जन्मोत्सवाच्या मुख्य दिवशी वाकलन कल्याण येथील हभप नरेंद्र महाराज पाटील यांच्या सुश्राव्य कीर्तन पार पडले.



विद्यार्थ्यांमध्ये आध्यात्मिक संस्कार रुजविण्यासाठी चिरनेर येथील प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी शिक्षकांसह परिपाठाच्या वेळेत कातळपाडा येथील दत्त मंदिरात हजेरी लावत श्री गुरुदत्तांचे मनोभावे दर्शन घेतले. तीन दिवस सुरू असलेल्या कार्यक्रमात, दत्तगुरूंची ग्रामभिक्षाफेरी, महाअभिषेक, भजन, कीर्तन, श्री दत्तगुरूंची पालखी मिरवणूक, श्री सत्यनारायणाची महापूजा, महाप्रसाद आणि सांस्कृतिक कार्यक्रम आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

दत्त उत्सव सोहळ्याचे नेटके व्यवस्थापन करण्यासाठी तरुणाई सरसावली होती. सुनियोजित नियोजन व संयोजन, तरुणाईचा मोठा सहभाग आणि कातळपाडा ग्रामस्थांचा संघटितपणा तसेच उत्सव कमिटीचे विशेष परिश्रम यामुळे श्री दत्तगुरूंचा दत्त जयंतीचा सोहळा अत्यंत भावभक्तीने झाला असल्याची माहिती कातळपाडा ग्रामस्थांनी दिली.

# रोहा-अष्टमी नव्या पुलावर धोकादायक जॉईंट

**✻ लोखंडी पोलच्या आवाजामुळे प्रवाशांना त्रास**
**✻ तातडीने दुरूस्ती करण्याची नागरिकांची मागणी**



**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा-अष्टमीदरम्यान नव्याने बांधण्यात आलेल्या पुलावरून वाहतूक सुरू असताना जोरदार धडामधूम आवाज येत असल्याची तक्रार नागरिक आणि प्रवासी वर्गातून मोठ्या प्रमाणात होत आहे. पुलाच्या मधोमध बसवलेला लोखंडी पोल/जॉइंट हा पूर्णपणे वर उचललेला असल्यामुळे वाहन त्यावरून जाताना प्रचंड आवाज होत आहे.

विशेषतः दुचाकी आणि हलक्या वाहनांना तीव्र धक्का बसत असून चालक थेट घाबरून ब्रेक मारण्याच्या परिस्थितीत पोहोचत आहेत. रात्रीच्या वेळी तर या ठिकाणचा आवाज आणखी भेसूर होत असल्याचे प्रवाशांनी सांगितले. नुकतेच बांधकाम पूर्ण झालेल्या पुलामध्ये असा गंभीर तांत्रिक दोष आढळणे धक्कादायक असल्याचेही स्थानिकांनी नमूद केले.

ज्या ठिकाणी लोखंडी जॉइंट बसवण्यात आला आहे, त्या भागातील संपूर्ण सिमेंट/कॉँक्रीट एका बाजूने निघून गेलेले असल्याचेही निदर्शनास आले आहे. त्यामुळे जॉइंट अधिक बाहेर येत असून वाहनांना बसणारा धक्का आणि होणारा आवाज दोन्ही वाढल्याचे चित्र आहे. या ठिकाणी वाहने घसरू शकण्याची किंवा नियंत्रण सुटण्याची शक्यता असल्याने प्रवाशांमध्ये भीती अधिक वाढली आहे.

वाहतूकदार, स्थानिक नागरिक व प्रवासी वर्गाने संबंधित विभाग आणि ठेकेदारांना तात्काळ दुरुस्ती करून जॉइंट नीट बसवण्याची तसेच उखडलेल्या कॉँक्रीटची पुनर्बांधणी करण्याची जोरदार मागणी केली आहे. अन्यथा वाहतूक सुरक्षिततेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण होऊ शकते, असा इशारा देण्यात आला आहे.

याबाबतीत सार्वजनिक बांधकाम विभागाचे उप अभियंता बागुल यांच्याशी फोनवरून संवाद साधला असता कोणताही संवाद झालेला नाही. तर सबंधित विभागाने तातडीने वास्तविक पाहणी करून आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी सर्व स्तरातून मागणी होत आहे.

# दिघी पोर्ट दरवर्षी दोन लाख वाहन हाताळणीस सज्ज



**म्हसळा : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील दिघी पोर्ट आता दरवर्षी दोन लाखांहून अधिक वाहने हाताळण्यास सज्ज होत असून, त्यामुळे श्रीवर्धन-म्हसळा-मुरूड परिसराच्या विकासाला नवे दार उघडणार आहे.

यासाठी मदरसन समूहाच्या संयुक्त उपक्रम कंपनी समवर्धन मदरसन हामाक्युरेक्स इंजिनिअर्ड लॉजिस्टिक्स लिमिटेड (SAMRX) ने दिघी पोर्ट लिमिटेड (DPL) सोबत महत्वपूर्ण भागीदारी करार केला आहे. डीपीएल ही अदानी पोर्ट्स अँड स्पेशल इकॉनॉमिक झोन (APSEZ) ची उपकंपनी आहे. दिघी पोर्ट बनेल 'ऑटोमोबाईल एक्स्पोर्ट हब' या करारानुसार दिघी पोर्टवर वाहन निर्यातीसाठी अत्याधुनिक विशेष सुविधा उभारली जाणार आहे. त्यामुळे हे बंदर मुंबई-पुणे ऑटो बेल्टसाठी प्रमुख निर्यात केंद्र ठरणार आहे.

'मेक इन इंडिया' उपक्रमाला चालना मिळत असून वाहनांची आंतरराष्ट्रीय बाजारातील निर्यात-आयात प्रक्रिया अधिक सुरळीत होणार आहे.

दिघी पोर्टच्या वाढत्या क्षमतेमुळे स्थानिक उद्योग, रोजगार आणि पायाभूत विकासाला मोठी चालना मिळणार आहे. यामुळे संपूर्ण किनारपट्टी भागातील अर्थव्यवस्था गतिमान होण्याची शक्यता आहे.

# चांढवे येथे विद्यार्थ्यांची हिमोग्लोबिन तपासणी

**महाड : प्रतिनिधी**


रोटरी क्लब ऑफ महाड यांच्या चेरी ब्लॉसम प्रोजेक्ट अंतर्गत चांढवे हायस्कूल, चांढवे येथे हिमोग्लोबिन तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात एकूण १६० विद्यार्थ्यांची हिमोग्लोबिन तपासणी करण्यात आली.

या उपक्रमास रोटरी प्रेसिडेंट नॉमिनी रोटे, राजीव वनारसे, माजी अध्यक्ष व प्रकल्प प्रमुख डॉ. राहुल सुकाळे, तसेच सुकाळे नर्सिंग होमची वैद्यकीय टीम यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले. शिबिराच्या आयोजनासाठी शाळेचे मुख्याध्यापक वन्नेरे सर, शिक्षकवृंद आणि शाळा प्रशासन यांनी सक्रिय सहकार्य केले. शिबिरादरम्यान डॉ. राहुल सुकाळे यांनी विद्यार्थ्यांना हिमोग्लोबिनचे महत्त्व, संतुलित आहार, स्वच्छतेची गरज, ॲनिमिया प्रतिबंधाचे उपाय आणि नियमित आरोग्य तपासणी याबाबत सोप्या व प्रभावी पद्धतीने मार्गदर्शन केले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये आरोग्य जागरूकता वाढली आणि सकारात्मक दृष्टिकोन निर्माण झाला.

रोटरी क्लब ऑफ महाड सातत्याने समाजोपयोगी उपक्रम राबवत असून, या प्रकल्पातून अनेक विद्यार्थ्यांना निरोगी व उज्ज्वल भविष्याची दिशा मिळत आहे, असे रोटरी क्लबच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.



# पेण उपविभागीय पोलीस कार्यालयात मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन दाखल



**पेण : प्रतिनिधी**

जिल्ह्यात उपविभागीय पोलीस कार्यालयाला एक मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन देण्यात येणार आहे. यात पेण उपविभागीय पोलीस कार्यालय येथे मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन दाखल झाली आहे असे रायगड पोलीस अधिक्षक आंचल दलाल यांनी माहिती देताना सांगितले.

गुन्हे अन्वेषणाची गती वाढवणे आणि गुन्ह्याच्या ठिकाणीच फॉरेन्सिक पुरावे गोळा करणे व त्याचे विश्लेषण करणे या तत्त्वावर मोबाईल फॉरेन्सिक व्हॅनचे उद्देश आहे तसेच भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ नुसार सात वर्षे किंवा त्याहून अधिक शिक्षा असलेल्या गुन्ह्यांसाठी फॉरेन्सिक पुराव्याचा वापर करून जलदगतीने तपास लावण्यासाठी मोबाईल फॉरेन्सिक व्हॅनचा उपयोग रायगड पोलिसांकडून करण्यात येत आहे. पेण उपविभागीय पोलीस कार्यालयात मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन दाखल झाली असून या व्हॅन मध्ये विशेष पथक असणार आहे तसेच अत्याधुनिक साहित्य यंत्रणा व्हॅन मध्ये उपलब्ध करण्यात आली आहे.

प्रत्येक उपविभागीय पोलीस कार्यालयास एक मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन मिळेल असेही रायगड पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी माहिती देताना सांगितले. पेण उपविभागीय पोलीस अधिकारी जालिंदर नालकुल व पोलीस निरीक्षक संदिप बागुल यांनी या मोबाईल फॉरेन्सिक व्हॅनची माहिती घेत पाहणी केली.

# पेणमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

**पेण : प्रतिनिधी**

महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिनी या दिनास ६९ वर्ष पूर्ण होत असताना या निमित्ताने देशातील लाखों भीम अनुयायी दादर चैत्यभूमी येथे जाऊन बाबासाहेबांना नतमस्तक होतात त्याच अनुषंगाने आज सकाळपासूनच पेण शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याला अनेकांकडून अभिवादन करण्यात आले.

या वेळी पेण डीवायएसपी जालिंदर नालकुल, पोलीस निरीक्षक संदीप बागुल यांच्यासह पोलीस अधिकारी, कर्मचारी यांनी तर काही राजकीय मंडळींसह सामाजिक संघटनांमधील माजी नगरसेवक पांडुरंग जाधव, बौद्ध महासभेचे शहराध्यक्ष आनंद जाधव, माजी नगरसेवक जनार्दन जाधव, नागेश सुर्वे, वंचित बहुजन आघाडीचे सुनील धामणकर, पीआरपीचे जिल्हाध्यक्ष सिताराम कांबळे, प्रभाकर घायतळे यांच्यासह महिलावर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# काकळघर येथे आदिवासींना ब्लँकेट वाटप



**रेवदंडा : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील काकळघर ग्रामपंचायतीच्या सभागृहात आदिवासीना ब्लँकेट वाटप कार्यक्रम मोठया उत्साहात पार पडला.

लायन्स क्लब ऑफ मुरूड व मांडवा-अलिबाग स्तुत्य उपक्रमाने आदिवासी वाडी महाळूंगे व ठाकूरवाडी महाळुंगे बु. यांना मोफत ब्लंकेट वाटप कार्यक्रम शनिवारी घेण्यात आला.

या वेळी लायन्स क्लब ऑफ मुरूडचे विदयमान अध्यक्ष सनी सोगांवकर, शिवसेना तालुका प्रमुख निलेश घाटवळ, लायन्स सि.एम.ठाकूर, काकळघर ग्रामपंचायत सरपंच स्वस्तिक ठाकूर, उपसरपंच निशांत दांडेकर, शिवसेना महिला विभाग प्रमुख व मांडळा ग्रा.प.माजी सरपंच साक्षी गायकवाड,मुरूड पं.स.माजी सभापती व ग्रा.प.सदस्या काळीताई ठाकूर, अशोक मुरूडकर, समीर कोटकर, लायन्स विकास काकुर्डे, दिघे, धर्मेंद्र गायकवाड तसेच मोठया संख्येने आदिवासी वाडी महाळूंगे व ठाकूरवाडी महाळुंगे बु. समाज बांधव व भगिनी यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे सुरूवातीस काकळघर ग्रामपंचायतीचे वतीने उपस्थित मान्यवर लायन्स क्लब ऑफ मुरूड अध्यक्ष सनी सोगांवकर, लायन्स सि.एम.ठाकूर, लायन्स विकास कातुर्डे, तसेच शिवसेना मुरूड तालुका प्रमुख निलेश घाटवळ, महिला विभाग प्रमुख साक्षी गायकवाड, आदीचे स्वागत सरपंच स्वस्तिक ठाकूर, उपसरपंच निशांत दांडेकर, सदस्या काळीताई ठाकूर यांचे हस्ते शाल, पुष्पगूच्छ प्रदान करून करण्यात आले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन धर्मेद गायकवाड यांनी केले.

# चौक येथे दिले अजगराला जीवदान

**चौक : प्रतिनिधी**

चौक नवीन वसाहत येथे अजगर जातीच्या सापाला पकडून त्याच्या अधिवासात सोडून दिले.



मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक चार चौक येथील नविन वसाहत येथे १२ फूट लांबीचा आणि १० किलो वजनाचा अजगर जातीचा साप आढळून आला, त्यामुळे येथे भितीची वातावरण निर्माण झाले होते, सामाजिक कार्यकर्ते स्वप्नील सोनटक्के यांनी तुपगाव येथील सर्पमित्र मदन दादा गुरव यांना ही माहिती दिली असता, त्यांनी त्वरीत येऊन अजगर साप पकडून त्याच्या अधिवासात सोडून दिले.

त्यामुळे भीतीचे वातावरण निवळले. अजगर सापाला बघण्यास गर्दी झाली होती.

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात महामानवाला अभिवादन

**अलिबाग : प्रतिनिधी**

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अलिबाग येथे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. या वेळी विशेष मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.



कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान अधिष्ठाता डॉ.पुर्वा पाटील मॅडम यांनी भूषविले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून बार कौन्सिल अलिबाग अध्यक्ष ॲड. प्रसाद पाटील, सहयोग व्यापारी नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष योगेश मगर हे उपस्थित होते. ॲड. प्रसाद पाटील सरांनी वैद्यकीय विद्यार्थ्यांना मूलभूत अधिकार व मूलभूत कर्तव्ये, संविधानिक मूल्ये, नागरिकांच्या जबाबदाऱ्या तसेच आरोग्य क्षेत्रातील नैतिकता या विषयांवर प्रभावी, माहितीपूर्ण आणि प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये संविधानिक जाणीव, सामाजिक बांधिलकी आणि मूल्याधिष्ठित नागरिकत्वाची भावना दृढ झाली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी स्टुडंट कौन्सिलसह सर्व विभागांचे मोलाचे सहकार्य लाभले.

डॉ.सुधाकर बंटेवाड, डॉ. विशाल उबाळे, डॉ.पवन शिरसागर, डॉ.करण वाघमारे, डॉ.रजत खानवलकर, तसेच ए. ओ. डहाके व गावंड मॅडम यांचे विशेष योगदान लाभले कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# वर्षातील शेवटच्या संकष्ट चतुर्थीला बल्लाळेश्वराच्या चरणी भाविकांची गर्दी

**पाली : प्रतिनिधी**

मार्गशिष महिन्याच्या शेवटच्या संकष्ट चतुर्थीला रविवारी (दि. ७) अष्टविनायक तीर्थक्षेत्र पालीत भाविक श्री. बल्लाळेश्वराच्या चरणी हजारोच्या संख्येने लीन झाल्याचे पहावयास मिळाले. शनिवार व रविवार लागून आलेल्या सुट्टीमुळे

अष्टविनायक तीर्थक्षेत्र पालीत भाविकांची उसळली अलोट गर्दी उसळली होती. अशातच पाली बलाप प्रस्तावित असलेला बायपास मार्ग रखडल्याने वाहतूक कोंडीने भाविक, पर्यटक व नागरिक खूप त्रासले असल्याचे दिसून आले. या वेळी रायगड कोकणासह राज्याच्या कानाकोपऱ्यातून भाविक दाखल झाले होते. गावोगावातून श्री बल्लाळेश्वर भेटीसाठी पालख्या देखील आल्या होत्या.



श्री बल्लाळेश्वर मंदिर व गाभाऱ्यात फुलांची सजावट करण्यात आली होती. बल्लाळेश्वरलादेखील आभूषण व वस्त्र परिधान करण्यात आले होते. तसेच मंदिरा बाहेर रांगोळी देखील काढण्यात आली होती. बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी जिल्ह्यासह विविध भागातून भाविक दाखल झाले होते. यामुळे येथे चांगली आर्थिक उलाढाल झाली असून येथील स्थानिक व्यावसायिक सुखावले आहेत.

भाविकांमुळे येथील हॉटेल व्यावसायिक, लॉजिंग बोर्डिंग वाले, पापड, लोणचे मिरगुंड विक्रेते, पेढेवाले, छोटे मोठे दुकानदार व इतर व्यावसायिकांचा धंदा तेजीत होता. मंदिर परिसरातील दुकाने व हॉटेल ग्राहकांनी गजबजले होते. भाविकांच्या सोयीसाठी बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टच्या वतीने चोख व्यवस्था करण्यात आली होती. विविध वस्तूंनी भरलेली दुकाने व गर्दी यामुळे मंदिर परिसर गजबजलेला दिसत होता.

मंदिर परिसराला यात्रेचे स्वरूप आले होते. अनेक भाविक स्वतःची वाहने घेवून आले होते. तर काही लक्झरी किंवा खाजगी बसेसने आले. यामुळे पालीतील रस्त्यावर वाहतूक कोंडी झाली होती.

संकष्ट चतुर्थी असल्यामुळे मोठ्या प्रमाणात भाविक दर्शनासाठी आले होते. या भाविकांनी दुकानातून चांगली खरेदी केली. त्यामुळे धंदा चांगला झाला आहे. बल्लाळेश्वर मंदिर परिसरातील व्यावसायिक मनोहर मोरे यांनी सांगितले.

दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची कुठल्याही प्रकारची गैरसोय होत नाही. देवस्थान ट्रस्ट तर्फे सर्वतोपरी योग्य व्यवस्था करण्यात आली असल्याचे बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष जितेंद्र गद्रे यांनी सांगितले.

# कोषाणे येथे श्रमदानातून साकारला वनराई बंधारा

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुका कृषी विभागाच्या माध्यमातून श्रमदानातून वनराई बांधण्याच्या कामाचा उपक्रमाला सुरुवात झाली आहे. वनराई बंधाऱ्यांच्या माध्यमातून जमिनीमधील पाण्याची पातळी वाढवण्यासाठी वनराई बंधारे बांधून नाले आणि नद्यांमधून वाहणारे पाणी अडवण्याचा उपक्रम सुरु केला आहे. कोषाणे येथे श्रमदानाने वनराई बंधारा बांधण्याच्या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.

कर्जत कृषी विभागाच्या वतीने कर्जत तालुक्यात उन्हाळ्यात कोरड्या असलेले नदी आणि नाल्याच्या ठिकाणी असलेले पाणी अडवण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. हे पाणी अडवण्यासाठी कृषी विभाग यांच्याकडून दरवर्षी केला जातो. यावर्षी श्रमदानातून वनराई बंधारे बांधण्याच्या उपक्रमाचा शुभारंभ कृषी विभागाच्या वतीने करण्यात आला. कृषी विभागाच्या आवाहनानंतर स्थानिक ग्रामस्थ राजेंद्र ठोंबरे यांनी श्रमदानात आपल्या गावातील सहकारी यांच्यासह सहभाग घेतला.

कृषी विभागाचे कर्जत तालुका मंडल कृषी अधिकारी दिनेश कुमार कोळी तसेच सहायक कृषी अधिकारी पंकज सोनकांबळे यांनी श्रमदान करणाऱ्या कर्मचारी आणि ग्रामस्थ यांना मार्गदर्शन केले. कर्जत तालुक्यात कृषी विभागाला वनराई बंधारे बांधण्यासाठी मिशन ग्रीन मुंबईचे डॉ. सुभाजीत मुखर्जी आणि लीप इंडिया फौन्डेशन यांच्याकडून सहकार्य केले जात आहे. सदर वनराई बधाऱ्यातील पाण्याचा उपयोग भाजीपाला व कडधान्य पिकांसाठी पाण्याचा वापर करण्यात येणार आहे.



# भारत-पाकिस्तान क्रिकेटचा थरार

## १४ डिसेंबरला अंडर-१९ आशिया कपमध्ये लढत

**दुबई : वृत्तसंस्था**

आगामी अंडर-१९ आशिया कप २०२५ स्पर्धेसाठी भारतीय संघाचे वेळापत्रक जाहीर झाले आहे. क्रिकेटप्रेमींसाठी सर्वात मोठी आणि बहुप्रतिक्षित बातमी म्हणजे कट्टर प्रतिस्पर्धी पाकिस्तानविरुद्धचा हाय-व्होल्टेज सामना कोणत्या दिवशी होणार हे निश्चित झाले आहे.

युवा कर्णधार आयुष म्हात्रे याच्या नेतृत्वाखालील भारतीय संघ १२ डिसेंबरपासून सुरू होणाऱ्या या स्पर्धेमध्ये विजेतेपदासाठी आपले आव्हान सादर करण्यास सज्ज झाला आहे. यामध्ये वैभव सूर्यवंशी आणि इतर युवा खेळाडू आपली क्षमता सिद्ध करण्यासाठी उत्सुक आहेत.

या स्पर्धेत भारत आणि पाकिस्तान संघांना गट 'अ' मध्ये स्थान देण्यात आले आहे. त्यामुळे त्यांच्यातील द्वंद्व निश्चित




झाले आहे. संपूर्ण जगाचे लक्ष लागून राहिलेला भारत-पाकिस्तान अंडर-१९ सामना १४ डिसेंबर रोजी खेळला जाणार आहे. विशेष म्हणजे हा सामना रविवारी असल्याने क्रिकेट चाहत्यांना एक मोठी क्रिकेट मेजवानी मिळणार आहे. भारतीय वेळेनुसार सर्व सामने सकाळी १०.३० वाजता सुरू होतील. त्यापूर्वी १० वाजता नाणेफेक होईल.

यंदाच्या आशिया कपचे यजमानपद दुबईकडे आहे. स्पर्धेत एकूण आठ संघ सहभागी होत आहेत, ज्यांची दोन गटांत विभागणी करण्यात आली आहे. ग्रुप 'अ'मध्ये भारत, पाकिस्तान, युएई, मलेशिया, तर ग्रुप 'ब'मध्ये अफगाणिस्तान, बांगलादेश, श्रीलंका, नेपाळ या संघांचा समावेश आहे.

प्रत्येक संघ आपल्या गटातील संघांशी एक-एक सामना खेळेल. दोन्ही गटांमधून अव्वल दोन संघ सेमीफायनलमध्ये प्रवेश करतील. त्यानंतर २१ डिसेंबर रोजी विजेतेपदासाठी अंतिम सामना खेळला जाईल.

**टीम इंडियाचे वेळापत्रक (ग्रुप स्टेज)**

१२ डिसेंबर : विरुद्ध युएई
१४ डिसेंबर : विरुद्ध पाकिस्तान
१६ डिसेंबर : विरुद्ध मलेशिया

**भारतीय संघ :** आयुष म्हात्रे (कर्णधार), विहान मल्होत्रा (उपकर्णधार), वैभव सूर्यवंशी, वेदांत त्रिवेदी, युवराज गोहिल, डी दीपेश, अभिज्ञान कुंडू व हरवंश सिंह (यष्टिरक्षक), कनिष्क चौहान, खिलान पटेल, नमन पुष्पक, हेनिल पटेल, किशन कुमार सिंह, उधव मोहन, आरोन जॉर्ज.

# एमसीए इन्व्हिटेशन ट्रॉफी स्पर्धेतील १५ सामने रायगडात खेळले जाणार

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन (एमसीए)च्या वतीने आयोजित १९ वर्षाखालील मुलांच्या आंतरजिल्हा व नामांकित क्रिकेट क्लबच्या निमंत्रित (इन्व्हिटेशन ट्रॉफी) स्पर्धेतील १५ दोन दिवसीय सामने रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशन (आरडीसीए)च्या वतीने रायगडातील विविध मैदानांवर ८ ते २१ डिसेंबरदरम्यान खेळले जाणार आहेत.

ग्रुप 'ई'मध्ये हिंगोली, सातारा, बीड, वायएमसीए क्रिकेट क्लब, ट्रिनिटी क्रिकेट क्लब, साऊथ झोन अशा सहा संघांचे साखळी फेरीतील सामने रिलायन्स क्रिकेट मैदान नागोठणे, छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगण पेण, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सिक्युरिटी मार्केट्स रसायनी पाताळगंगा, छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगण उलवे (पनवेल) या मैदानांवर हे सामने होणार आहेत.

रिलायन्स क्रिकेट मैदान नागोठणे येथे गेल्या महिन्यात बीसीसीआय आयोजित कूच बिहार ट्रॉफी स्पर्धेतील महाराष्ट्र विरुद्ध ओडिशा हा १९ वर्षाखालील मुलांचा चार दिवसीय सामना आरडीसीएतर्फे यशस्वीरित्या आयोजित करण्यात आला होता. रायगड जिल्ह्यात सातत्याने बीसीसीआय व एमसीए तसेच जिल्हा अंतर्गत होणाऱ्या विविध अकॅडमी व क्लबचे सामने होत आहे. त्यामुळे जिल्ह्यात लेदर बॉल क्रिकेटला पुन्हा एकदा नवसंजीवनी मिळताना दिसत आहे. यासाठी आरडीसीएचे पदाधिकारी व सदस्य परिश्रम घेत असल्याची माहिती अध्यक्ष अनिरुद्ध पाटील व सचिव प्रदीप नाईक यांनी दिली.

दरम्यान, रायगडात सातत्याने एमसीएच्या मॅचेस होत असल्याचा आपल्याला आनंद आहे व त्यासाठी एमसीएच्या सर्व पदाधिकारी, सदस्यांचे आभार मानत असल्याचेही आरडीसीएचे अध्यक्ष पाटील यांनी सांगितले.

# रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये हिट्स डे उत्साहात; विद्यार्थ्यांचा सहभाग



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये वार्षिक क्रीडा स्पर्धांची पहिली फेरी (हिट्स डे) ६ व ७ डिसेंबर रोजी मोठ्या उत्साहात झाली. विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या क्रीडा गुणांना वाव देण्यासाठी आयोजित या स्पर्धांना संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी रविवारी भेट देत शुभेच्छा दिल्या.

पहिल्या दिवशी पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागाच्या विविध क्रीडा स्पर्धा पार पडल्या, तर दुसऱ्या दिवशी माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागाच्या स्पर्धा घेण्यात आल्या. यामध्ये जवळपास चार हजार



विद्यार्थ्यांचा सहभाग होता. प्रत्येक विद्यार्थ्याला विविध तीन स्पर्धांमध्ये भाग घेता येणार होता. एवढ्या मोठ्या स्वरूपाची ही स्पर्धा अत्यंत शिस्त व नियोजनबद्ध रीतीने यशस्वी झाली.

विद्यार्थ्यांचा उत्साह वाढविण्यासाठी त्यांचा पालकवर्गही मोठ्या प्रमाणात या ठिकाणी उपस्थित होता. पहिल्या दिवशी प्रमुख अतिथी म्हणून खारघर स्पोर्ट्स अकॅडमीचे अध्यक्ष किरण पाटील उपस्थित होते. त्यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर नेहमीच खेळाडूंना पाठबळ देत मदत करत असतात. रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलची विद्यार्थिनी व आमच्या प्रभागातील रहिवासी स्वस्तिका घोष ही आज आंतरराष्ट्रीय स्तरावर टेबल टेनिसपटू म्हणून खेळत आहे याचा सार्थ अभिमान आम्हा सर्वांनाच आहे. स्कूलचा नावलौकिक वाढवण्याचे काम प्राचार्य राज अलोनी व त्यांचे सर्व सहकारी करत आहेत, असे सांगितले.

या स्पर्धेत विजेत्या खेळाडूंची अंतिम फेरीसाठी निवड करण्यात आली असून १८ जानेवारी रोजी अंतिम फेरी होणार आहे. विद्यालयाच्या मुख्याध्यापिका राज अलोनी यांच्या मार्गदर्शनाखाली या दोन दिवसांच्या स्पर्धा उत्साहात रंगल्या. कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्य स्वप्नाली म्हात्रे उपस्थित होत्या.

# रामशेठ ठाकूर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय बॉक्सिंगमध्ये चॅम्पियन



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवानिमित्त आयोजित जेबीएसपी संस्था आंतर-महाविद्यालयीन बॉक्सिंग स्पर्धेत १७ वर्षाखालील मुले व मुलींमध्ये खारघर येथील रामशेठ ठाकूर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी विजेतेपद पटकाविले.

स्पर्धा खांदा कॉलनीतील चांगू काना ठाकूर (सीकेटी) महाविद्यालय येथे झाली. यामध्ये रामशेठ ठाकूर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील एकूण ४५ मुला-मुलींनी सहभाग घेतला होता. त्यांनी १५ सुवर्ण, प्रत्येकी पाच रौप्य आणि कांस्य अशी एकूण सर्वाधिक २५ पदके जिंकली. विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पदक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले तसेच सर्व शाळा-कॉलेजमधील प्राविण्य मिळविणाऱ्या खेळाडूंच्या पदकांचा एकूण गुणानुक्रम काढून चॅम्पियनशिप काढण्यात आली. यामध्ये १७ वर्षाखालील मुले व मुली या दोन्ही गटात चॅम्पियनशिप मिळविण्याचा बहुमान रामशेठ ठाकूर विद्यालयाने प्राप्त केला.

स्पर्धेत सर्वाधिक सहभाग घेतल्याबद्दल माध्यमिक विभागाचे क्रीडा शिक्षक संभाजी जाधव, उच्च माध्यमिक विभागाचे प्रवीण पाटील व महेंद्र पाटील यांचा चषक देऊन विशेष सन्मान करण्यात आला.

या कामगिरीबद्दल संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर, संचालक आमदार प्रशांत ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, सचिव डॉ. एस.टी. गडदे, उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्राचार्य निशा नायर, माध्यमिक विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक संतोष खांदेकर यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या क्रीडा शिक्षकांचे अभिनंदन केले.



# किक बॉक्सिंगमध्ये आर्या मानेला सुवर्णपदक



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

राज्यस्तरीय शालेय किक बॉक्सिंग स्पर्धेत नवी मुंबईतील नेरूळ येथील आर्या सचिन माने हिने सलग दुसऱ्या वर्षी सुवर्णपदक पटकाविले. तिची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

राज्य क्रीडा व युवक संचालनालय आणि गोंदिया जिल्हा क्रीडा कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय शालेय किक बॉक्सिंग स्पर्धेचे आयोजन जिल्हा क्रीडा संकुल, आमगाव गोंदिया येथे नुकतेच करण्यात आले होते. या स्पर्धेत नवी मुंबई महानगरपालिका सीबीएसई शाळा क्र. ९३, सीवूड्स येथील विद्यार्थिनी आर्या माने हिने १४ वर्षाखालील वयोगट व २८ किलोखालील वजनी गटात सुवर्णपदक जिंकले. याबद्दल अनेकांनी तिचे अभिनंदन केले आणि राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात पॅरेंट स्पोर्ट्स मीट

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवानिमित्त खारघर येथील रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात रविवारी (दि. ७) पॅरेंट स्पोर्ट्स मीटचे आयोजन करण्यात आले होते. त्यास प्रतिसाद लाभला.




स्पोर्ट्स मीटचे उद्घाटन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते झाले. या वेळी स्कूल कमिटी मेंबर प्रभाकर जोशी, भाजप पनवेल उत्तर मंडळ सचिव जयदास तेलवणे, प्रभाग ३ महिला अध्यक्ष लहा मॅडम, हभप मनोहर कडू, इसीपीटीएच्या व्हाइस चेअरमन श्रद्धा तेलवणे, प्राचार्य निशा नायर आदी उपस्थित होते.



उत्साह, आनंद आणि खेळभावनेने भरलेला पॅरेंट स्पोर्ट्स मीट उत्साहात पार पडला. या वेळी पालकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावून विविध खेळांमध्ये सक्रिय सहभाग घेतला.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सर्व पालकांचे अभिनंदन केले. त्यांच्या हस्ते विजेत्यांना बक्षीस देऊन गौरविण्यात आले. क्रीडा उपक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

## डे-नाईट कसोटीत ऑस्ट्रेलियाचा इंग्लंडवर विजय

**ब्रिस्बेन :** ॲशेस मालिकेतील रोमांचक डे-नाईट कसोटी ऑस्ट्रेलियाने जिंकली असून यजमान कांगरूंनी इंग्लंडला आठ गडी राखून मात दिली. या विजयासह ऑस्ट्रेलियाने मालिकेत २-० अशी महत्त्वपूर्ण आघाडी घेतली आहे. अवघ्या ६५ धावांचे लक्ष्य गाठताना ऑस्ट्रेलियाने १० षटकांतच सामना खिशात घातला आणि गॅबाच्या मैदानावर इंग्लिश संघाला १४व्यांदा धूळ चारली.

## रोहित शर्मा बनला २० हजारी मनसबदार!

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय संघाचा धडाकेबाज सलामीवीर फलंदाज रोहित शर्माने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये एक मोठा टप्पा गाठला. दक्षिण आफ्रिकेविरुद्ध विशाखापट्टणम येथील स्टेडियमवर झालेल्या तिसऱ्या वनडे सामन्यात त्याने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये २० हजार धावा पूर्ण करण्याचा भीमपराक्रम केला.

या ऐतिहासिक कामगिरीसह हिटमॅन रोहित आता मास्टर-ब्लास्टर सचिन तेंडुलकर, 'द वॉल' राहुल द्रविड आणि 'रन मशीन' विराट कोहली यांसारख्या दिग्गजांच्या '२०-हजारी क्लब'मध्ये दाखल झाला आहे. अशी कामगिरी करणारा तो चौथा भारतीय आणि जगातील १४वा फलंदाज फलंदाज ठरला आहे.

## आंतर-महाविद्यालयीन बॉक्सिंग स्पर्धेत सीकेटी कॉलेज विजेते

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीतील चांगू काना ठाकूर (सीकेटी) महाविद्यालय येथे संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवानिमित्त जेबीएसपी संस्था आंतर-महाविद्यालयीन बॉक्सिंग स्पर्धा उत्साहात झाली. या स्पर्धेत मुले आणि मुली खुल्या अशा दोन्ही गटात यजमान सीकेटी कॉलेजने विजेतेपद, तर रामशेठ ठाकूर कॉलेज ऑफ सायन्स ॲण्ड कॉमर्सने उपविजेतेपद पटकाविले.




स्पर्धेत १५० स्पर्धकांनी सहभाग नोंदवला होता. १७ वर्षावरील मुले आणि मुलींमध्ये रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाने विजेतेपद, तर मुलींमध्ये अनुक्रमे सीकेटी विद्यालय इंग्रजी माध्यम माध्यमिक विभाग आणि सीकेटी विद्यालय मराठी माध्यम माध्यमिक विभाग यांनी उपविजेतेपद प्राप्त केले. त्याचबरोबर सीकेटी कॉलेज खांदा कॉलनीच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत जनरल चॅम्पियनशिप जिंकली.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी जिमखाना विभागाचे चेअरमन डॉ. व्ही.बी. नाईक, सहसंचालक प्रा. अनिल नात्ती, प्रा. भरत जितेकर, प्रा. प्रतिज्ञा पाटील यांच्यासह जिमखाना विभागाच्या सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com